७० वर्ष

दैनिक

# संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

सोमवार, दि. ३० मार्च २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०९४ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


## शेतात मिरच्या तोडणाऱ्या महिलेवर वाघाचा प्राणघातक हल्ला

साकोली (दै. संध्या) : शेतात मिरची तोडत असताना अचानक पट्टेदार वाघाने महिलेवर प्राणघातक हल्ला केल्याची घटना २८ मार्च रोजी सकाळच्या सुमारास उमरझरी येथे घडली. माया रामकृष्ण सोनवाणे (वय ५५,रा. उमरझरी, ता.साकोली) असे जखमी महिलेचे नाव आहे. शनिवार दिनांक २८ मार्चला सकाळी नऊ वाजता शेतात मिरच्या तोडत असताना पट्टेदार वाघाने अचानक महिलेवर हल्ला करून जखमी केले. जवळच काम करणारे तिचे पती रामकृष्ण सोनवाणे यांनी जोराने आरडाओरडा केली. लगेच आजूबाजूच्या शेतात काम करणारे सर्व शेतकरी धावून आल्याने वाघ पळाला. परंतु यात माया सोनवणे या वाघाच्या हल्ल्यात गंभीर जखमी झाल्या. त्यांना उपचारासाठी साकोली उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. उमरझरी येथील सोनवणे यांची जंगलालगत अर्धा एकर शेतजमीन असून त्यांनी त्यात मिरचीचे पिक लावले आहे. सध्या मिरची तोडण्याचा हंगाम सुरू असून सकाळी आठ वाजता माया सोनवणे व तिचे पती हे दोघेही शेतात मिरच्या तोडत असताना अचानक वाघाने माया सोनवणे यांच्यावर हल्ला केला.

### ढिंग-टांग




# चॅटबॉटमुळे नागरिकांना अचूक माहिती

### १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स उपक्रमात शालेय शिक्षण विभागाचा गौरव



मुंबई (दै. संध्या)

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत तंत्रज्ञानाधिष्ठित उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करून नागरिक, विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांना व्हॉट्सअॅप चॅटबॉटच्या माध्यमातून २४x७ तत्पर, बहुभाषिक आणि सुलभ माहिती उपलब्ध करून देण्यात यश मिळवले आहे. या अभिनव आणि लोकाभिमुख कामगिरीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विभागाचा गौरव करण्यात आला. डिजिटल प्रशासन, पारदर्शकता आणि सेवा वितरणात गती आणणाऱ्या या उपक्रमामुळे राज्यातील शिक्षण व्यवस्थेला नवे बळ मिळाले आहे. राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या कृती कार्यक्रमात शालेय शिक्षण विभागाने डिजिटल परिवर्तन, डेटा-आधारित निर्णयप्रक्रिया आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० शी सुसंगत प्रशासन यावर भर देत अनेक महत्त्वपूर्ण सुधारणा राबविल्या. विभागाची अधिकृत संकेतस्थळ व्यवस्था अधिक सक्षम करून धोरणे, परिपत्रके, अधिसूचना, डॅशबोर्ड आणि नागरिकाभिमुख सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करण्यात आल्या. यामुळे माहितीची पारदर्शकता वाढली असून विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि प्रशासकीय अधिकारी यांना माहिती सहज उपलब्ध होत आहे. शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे आणि राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाच्या सर्वांगीण गुणवत्तेत सुधारणा झाली असून ५७ विभागांमधून शालेय शिक्षण विभागाने सहावा क्रमांक मिळवल्याबद्दल प्रधान सचिव रणजितसिंह देओल यांनी समाधान व्यक्त केले आहे. क्षेत्रीय पातळीवर संपूर्ण कामाची अंमलबजावणी करणारे शिक्षण आयुक्त सच्चिंद्रप्रताप सिंह आणि मंत्रालय पातळीवर ई गव्हर्नन्स चे काम पूर्णत्वास नेणारे उपसचिव समीर सावंत यांचे त्यांनी विशेष कौतुक केले आहे.

ई-ऑफिस प्रणालीमुळे विभागातील फाईल्सची प्रगती, मंजुरी प्रक्रिया आणि प्रशासकीय कामे पूर्णपणे डिजिटल झाल्याने कार्यक्षमता, उत्तरदायित्व आणि पारदर्शकता वाढली आहे.

'आपले सरकार' पोर्टलशी जोडून शिक्षणाशी संबंधित विविध सेवा आणि प्रमाणपत्रे ऑनलाइन, वेळेत आणि उत्तरदायी पद्धतीने उपलब्ध करण्यात आली आहेत. यामुळे नागरिकांच्या शासकीय कार्यालयांतील फेऱ्या कमी झाल्या असून सेवा हक्क कायद्याअंतर्गत सेवा वितरण अधिक प्रभावी झाले आहे.

विभागाने नोंदणी, उपस्थिती, शैक्षणिक गुणवत्ता, शालेय पायाभूत सुविधा, शिक्षक नियोजन आणि विविध योजनांची अंमलबजावणी यांसारख्या प्रमुख बाबींवर लक्ष ठेवण्यासाठी परस्परसंवादी डॅशबोर्ड विकसित केले आहेत. या डॅशबोर्डच्या साहाय्याने सर्व प्रशासकीय स्तरांवर रिअल-टाइम आढावा घेऊन धोरणात्मक निर्णय अधिक अचूकपणे घेणे शक्य होत आहे.

#### व्हॉट्सअॅप चॅटबॉटद्वारे परिणामकारक संवाद

शालेय शिक्षण विभागाने राबविलेल्या बाबींमध्ये विशेष उल्लेखनीय म्हणजे विभागाने सुरू केलेला अधिकृत एआय-आधारित व्हॉट्सअॅप चॅटबॉट हा नागरिकांसाठी एक-खिडकी डिजिटल सहाय्यक ठरत आहे. शाळा व्यवस्थापन, विद्यार्थी कल्याण योजना, शिक्षकांच्या सेवाविषयक शंका, इयत्ता अकरावी प्रवेश, अपार आयडी, परीक्षा व निकाल, तसेच तक्रारी आणि अभिप्राय या सर्व बाबींवर मराठी आणि इंग्रजी भाषेत त्वरित माहिती उपलब्ध होत आहे. त्यामुळे विभाग आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक परिणामकारक झाला आहे.

### ब्रेकिंग न्यूज

#### 'ग्लोबल', 'इंटरनॅशनल' वगळण्याचे आदेश

नागपूर (दै. संध्या) : राज्य शिक्षण मंडळाशी संलग्न असूनही नावामध्ये 'ग्लोबल', 'इंटरनॅशनल' किंवा 'सीबीएसई' असे शब्द वापरून पालकांची दिशाभूल करणाऱ्या शाळांविरुद्ध शिक्षण विभागाने दंडुका उगारला आहे. शिक्षण संचालनालयाने ६ फेब्रुवारी २०२६ रोजी जारी केलेल्या आदेशाची अंमलबजावणी मार्च महिन्यापासून राज्यभर सुरू झाली असून, अपात्र शाळांच्या नावातील हे भपकेबाज शब्द तत्काळ वगळण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

#### इराण-इस्रायल युद्धाचा शेतीला फटका

मुंबई (दै. संध्या) : इराण आणि इस्रायल-अमेरिका यांच्यात वाढत चाललेल्या संघर्षामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर मंदीचे सावट असतानाच, याचे थेट परिणाम आता महाराष्ट्रातील शेती क्षेत्रावरही दिसू लागले आहेत. या युद्धामुळे आखाती देशांतील शेतीमालाच्या आयात-निर्यातीवर १०० टक्के परिणाम होणार असून, देशातील माल निर्यात न झाल्याने बाजारभावात मोठी घसरण पाहायला मिळत आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी चिंता व्यक्त केली असून, भविष्यात युरिया खताच्या साठ्याबाबतही काळजी घ्यावी लागणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

#### सेवा करणारे राज्यकर्ते अधिक गुन्हेगार

मुंबई (दै. संध्या) : शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी पत्रकार परिषद घेत सरकारवर टीका केली आहे. तसेच गॅस टंचाईच्या बाबतीत सरकारमध्येच मतभेद आहेत. अन्न व नागरी पुरवठा मंत्री म्हणतात गॅस टंचाई आहे, तर मुख्यमंत्री म्हणतात सगळे ठीक चालू आहे, असा टोला राऊत यांनी लगावला आहे. तसेच अशोक खरातच्या बाबतीत बोलताना म्हणाले की, भोंदूबाबाला भेटणाऱ्या सगळ्यांची चौकशी झाली पाहिजे. भोंदूबाबापेक्षा त्याची सेवा करणारे राज्यकर्ते अधिक गुन्हेगार, असा आरोपही राऊत यांनी केला आहे.

#### विलीनीकरणाचा मुद्दा पुन्हा चर्चेत

मुंबई (दै. संध्या) : गेल्या काही दिवसांपासून थंडावलेला दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाचा मुद्दा आमदार सुनील शेळके यांच्या विधानामुळे पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. जर दोन्ही पक्ष एकत्र येणार असतील आणि सुनेत्रा वहिनींच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद वाढत असेल, तर विलीनीकरणासाठी अजूनही वेळ गेलेली नाही, असे सूचक विधान शेळके यांनी केले. त्यांच्या या वक्तव्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी पक्षाची अधिकृत भूमिका मांडली आहे. सुनील तटकरे म्हणाले की, आमदार सुनील शेळके पुणे जिल्ह्यातील प्रभावी नेते आणि तरुण आमदार आहेत. अजितदादांचे विश्वासू सहकारी म्हणून त्यांनी उत्तम पद्धतीने काम केले आहे. मोठ्या फरकाने ते मावळ मतदारसंघातून निवडून आले आहेत.

### अशोक खरात प्रकरण महाराष्ट्रासाठी कलंक

## भोंदू बाबाशी सत्ताधाऱ्यांचे लागेबांधे

नागपूर (दै. संध्या)



अशोक खरात प्रकरण महाराष्ट्रासाठी कलंक आहे. कुठे नेऊन ठेवला महाराष्ट्र? असा सवाल काँग्रेस नेते नाना पटोले यांनी केला आहे. त्या भोंदू बाबासोबत सरकारमधील अनेकांचे संबंध असल्याचे पुढे आले आहे. सरकारच्या पापाचा घडा भरला आहे, आता ते भांडे फुटायची वेळ आली आहे, यामध्ये जे राजकारण सुरू आहे. हे अवैध धंदे सुरू होते त्यावेळी पोलिस झोपले होते का? असा सवालही पटोलेंनी केला आहे. नाना पटोले म्हणाले की, भाजपकडून लोकशाहीचा खून करण्यात आल्याचे दिसून आले. त्यांनी दोन्ही सभागृहात आपल्याला हवे तसे काम करता यावे म्हणून विरोधी पक्षनेता नेमला नाही. होतील असे कायदे पारित केले गेले. त्यामध्ये धर्मस्वातंत्र्याचा असो की महसूलचा कायदा असे बरेच कायदे आणले त्यातून शेतकऱ्यांना बरबाद करण्याचे ठरवले आहे. सर्वसामान्य जनतेला लुटायचे कायदे त्यांनी पारित केले. हे लोकशाही न मानणारे सरकार आहे. त्यांच्याकडून लोकशाहीची हत्या झाली.

# पेनड्राईव्ह उघडला तर सरकारला हादरे बसतील

### देश वाऱ्यावर सोडून सरकार प्रचारात मग्न : मित्र देश इराण आता शत्रू झाला : विजय वडेट्टीवार

नागपूर (दै. संध्या)



मोदी सरकार आणि भाजपने देश वाऱ्यावर सोडला आहे. देशाची काळजी या सरकारला राहिली नाही, केवळ निवडणूक जिंकत सत्ता मिळवणे याकडे त्यांचे लक्ष आहे. देश संकटात असताना नेते प्रचाराचे भाषण करत फिरत आहेत. लोकांना लाइनमध्ये उभे करत जीव घेण्याचा प्रयत्न सरकारकडून सुरू आहे, तरीही हे सांगतात की काही तुटवडा नाही, असे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. विजय वडेट्टीवार म्हणाले की, रशियाने इंधन देण्यास नकार दिला आहे, मित्र देश असलेला इराण शत्रू झाला आहे. हिंदू-मुस्लीम करत देश पुढे जाऊ शकत नाही. इंधन टंचाईमुळे कोणाचे बळी गेले तर भाजप सरकार त्यासाठी जबाबदार असेल. टंचाई नाही म्हणता मग अकोल्यात जो बळी गेला तो कसा झाला आहे. विजय वडेट्टीवार म्हणाले की, खरातची वरात आता कुठेपर्यंत जाते हे येणारा काळ सांगेल. त्या पेनड्राईव्हमधील सगळे व्हिडिओ दाखवले तर महाराष्ट्र सरकारला हादरे बसतील आणि सरकारच अडचणीत येईल असे महाभाग या खरातच्या कृत्यामध्ये सहभागी आहेत.ते जर उघड झाले तर महाराष्ट्रामध्ये राजकीय भूकंप येऊ शकतो. विजय वडेट्टीवार म्हणाले की, बदलापूरमध्ये सत्ताधारी पक्षातील व्यक्तीला वाचवण्यासाठी जसा एन्काउंटर करण्यात आला. बड्या लोकांना वाचवण्यासाठी खरातचे बरेवाईट करतील आणि पुरावे नष्ट करतील. त्यामुळे कायद्याने त्याला शिक्षा दिली पाहिजे. कुणालाही वाचवू नये, सरकारने या संदर्भात काळजी घेतली पाहिजे. विजय वडेट्टीवार म्हणाले की, अशोक खरात प्रकरणी राज्यात जे वातावरण निर्माण झाले आहे ते गंभीर आहे. काल आमदार केसरकर यांनी एक विधान केले की खरातला 39 आमदार भेटले माझेच नाव का घेता? याचा अर्थ असा की खरातच्या काळ्या कृत्याला साथ देणारे, त्यावर पांघरुण घालणारे, तिथे पुजा करणारे, भोंदू गिरी वाढवणारे 39 जे आमदार आहेत त्यांच्यावर गुन्हे दाखल झाले पाहिजे.

कायदे बनवणारे जर कायद्याविरोधात वागत असतील तर त्यांच्यावर गुन्हे दाखल झाले पाहिजे. केसरकरांनी त्या 39 आमदारांची यादी जाहीर केली पाहिजे. विजय वडेट्टीवार म्हणाले की, ज्योती वाघमारे या नवीन नवीन खासदार झाल्या आहेत. त्यांना विधाने करणे गरजेचे आहे, माध्यमांनी दखल घेतली जावी म्हणून त्या ऑपरेशन टायगर, तुतारी सारखी व्यक्तव्य करत आहे.

## १५० दिवस ई गव्हर्नन्स उपक्रमातील उत्कृष्ट कार्याबद्दल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाचा गौरव

### अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर व अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांनी स्विकारला सत्कार



मुंबई (दै. संध्या)

राज्य शासनाच्या १५० दिवस ई गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात सार्वजनिक बांधकाम विभागाने उल्लेखनीय कामगिरी करत डिजिटल परिवर्तनाची नवी दिशा निर्माण करत १८६.७५ गुण मिळवित सर्वोत्तम मंत्रालयीन विभागात राज्यात प्रथम स्थान पटकाविले आहे. या यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तत्कालीन अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर आणि विद्यमान अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांचा गौरव करण्यात आला. शासकीय कामकाजात पारदर्शकता आणि डिजिटल सुविधांचा वापर वाढवण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने 150 दिवसांचा प्रशासकीय सुधारणा कार्यक्रम राबविण्यात आला. ई-गव्हर्नन्स सुधारणा उपक्रमात उत्कृष्ट कार्य केलेल्या शासकीय विभागांचा आज सह्याद्री अतिथीगृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह विविध विभागांचे सचिव, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित होते.

#### तक्रार निवारणात मोठी झेप

१५० दिवसाच्या ई गव्हर्नन्स उपक्रमाअंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागाने तक्रार निवारण प्रणाली अधिक सक्षम करत 80 टक्क्यांवरून 99 टक्क्यांपर्यंत तक्रार निवारण दर वाढवला. एस्कलेशन झालेल्या तक्रारींमध्ये 12 टक्क्यांवरून 0.09 टक्क्यांपर्यंत घट झाली. दैनंदिन देखरेख, प्रलंबित तक्रारी ट्रॅक करण्यासाठी विविध स्तरावरील आढावा, वेळेत तक्रार निवारण आदीं उपाययोजनांमुळे ही सुधारणा शक्य झाली. विभागाकडे प्राप्त झालेल्या 1,248 तक्रारींचे विश्लेषण करण्यात आले असून त्यापैकी 39.5 टक्के तक्रारी रस्त्यांच्या देखभाल व गुणवत्तेशी संबंधित असल्याचे स्पष्ट झाले.

## चांदीवाल आयोगाचा अहवाल सार्वजनिक करा : अनिल देशमुख

नागपूर (दै. संध्या)



माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी चांदीवाल आयोगाचा अहवाल सार्वजनिक करण्याची मागणी राज्य सरकारकडे केली आहे. गृहमंत्री असताना त्यांच्यावर झालेल्या आरोपांच्या चौकशीसाठी हा आयोग नेमण्यात आला होता. या अहवालात त्यांना 'क्लीन चिट' मिळाल्याच्या बातम्या वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाल्या आहेत, असे देशमुख यांनी नागपूर येथे माध्यमांशी बोलताना सांगितले.

मुंबईचे तत्कालीन पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांनी देशमुख यांच्यावर १०० कोटी रुपये वसुलीचा खळबळजनक आरोप केला होता. या आरोपांची चौकशी करून सत्य जनतेसमोर यावे, अशी मागणी देशमुख यांनी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे पत्राद्वारे केली होती. त्यानुसार, उद्धव ठाकरे यांनी उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती कैलास चांदीवाल यांच्या अध्यक्षतेखाली या आयोगाची स्थापना केली होती.

या आयोगाने अकरा महिने कसून चौकशी केली. यात अनेकांच्या साक्षी नोंदवण्यात आल्या आणि कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. त्यानंतर, चौदाशे पानांचा अहवाल राज्य सरकारकडे सादर करण्यात आला. मात्र, राज्य सरकारने गेल्या दोन वर्षांपासून हा अहवाल दडवून ठेवला असल्याचा आरोप देशमुख यांनी केला आहे. हा अहवाल सार्वजनिक करण्यासाठी आपण विधानसभेत मागणी केली असून, राज्यपाल, मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांना पत्रही लिहिले आहे, असे देशमुख यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हा अहवाल जनतेसमोर का सादर करत नाहीत, याबाबत राज्य शासन काहीही बोलण्यास तयार नसल्याचेही त्यांनी नमूद केले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकत्रीकरणाबाबत कोणतीही चर्चा सुरू नसल्याचे देशमुख यांनी स्पष्ट केले. अजित पवार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख सुनील तटकरे आणि त्यांच्या पक्षातील काही आमदारांनी केलेली वक्तव्ये ही त्यांची वैयक्तिक मते आहेत. आमच्या पक्षात याबाबत कोणतीही चर्चा झालेली नाही. पक्ष संघटनात्मकदृष्ट्या कसा मजबूत होईल, यावरच आमचे लक्ष आहे, असे त्यांनी सांगितले. हे त्यांचे वैयक्तिक मत नसून पक्षाची भूमिका असल्याचेही त्यांनी नमूद केले. अशोक खरात यांच्याकडे राजकीय नेते कसे बळी पडत होते, याची चौकशी झाली पाहिजे आणि सत्य जनतेसमोर आले पाहिजे, अशी मागणीही देशमुख यांनी केली. सरकारमधील अनेक नेत्यांची नावे पुढे आली आहेत.




## संपादकीय

# नागपूरच्या प्रश्नावर सत्ताधारी-विरोधकांचे ‘सुरात सूर’

सध्याच्या राजकारणात सत्ताधाऱ्यांनी विरोधकांवर टीका करावी आणि विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना धारेवर धरावे, असेच चित्र सर्वसाधारणपणे दिसते. एका ठराविक चौकटीत बसलेली ही भूमिका क्वचितच बदलताना दिसते. मात्र नागपूरच्या प्रश्नांबाबत विधानसभेत वेगळे चित्र पाहायला मिळाले. भाजपचे प्रवीण दटके आणि काँग्रेसचे विकास ठाकरे या दोन माजी महापौर असलेल्या आमदारांनी शहराच्या मूलभूत प्रश्नांवर सकारात्मक भूमिका घेत ‘मिले सूर मेरा तुम्हारा’चा अनुभव दिला. हा केवळ योगायोग आहे की त्यामागे काही वेगळे राजकारण दडले आहे, याची चर्चा सुरू झाली आहे. विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन नुकतेच पार पडले. यावेळी नागपूरच्या विविध प्रश्नांवर अपेक्षेपेक्षा अधिक चर्चा झाली. नागपूर शहरात एकूण सहा आमदार आहेत. त्यापैकी दोन काँग्रेसचे आणि चार भाजपचे. भाजपच्या चार आमदारांपैकी एक मुख्यमंत्री आहेत. उर्वरित आमदारांमध्ये प्रवीण दटके यांनी विधानसभेत विशेष सक्रियता दाखवली. साधारणपणे आमदार आपापल्या मतदारसंघापुरते प्रश्न मांडतात; मात्र दटकेंनी संपूर्ण नागपूर शहराशी संबंधित प्रश्न उपस्थित केले. भाजपचे कृष्णा खोपडे यांनीही आवाज उठवला, पण तो प्रामुख्याने पूर्व नागपूरपुरता मर्यादित होता. काँग्रेसकडून विकास ठाकरे यांनी अधिवेशनात शहराच्या विविध प्रश्नांवर ठोस भूमिका घेतली. काही प्रश्न त्यांच्या पश्चिम नागपूर मतदारसंघाशी संबंधित होते, तर काही संपूर्ण शहराशी निगडीत होते. सत्ताधाऱ्यांना स्वतःच्या सरकारला थेट विचारणे कठीण असलेले काही मुद्दे विरोधकांच्या माध्यमातून पुढे आल्याचेही दिसले.या सर्व प्रक्रियेत एक बाब ठळकपणे समोर आली. नागपूरच्या प्रश्नांवर सत्ताधारी आणि विरोधक यांचे सूर जुळलेले दिसले. विशेषतः प्रवीण दटके आणि विकास ठाकरे यांनी अमली पदार्थांच्या वाढत्या व्यवसायावर गंभीर चिंता व्यक्त केली. तरुण पिढीला धोका निर्माण करणाऱ्या या समस्येकडे लक्ष वेधताना त्यांनी पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आणि उपाययोजनाही सुचवल्या. याशिवाय महापालिकेतील नोकरभरती, अग्निशमन विभागातील अपुरे मनुष्यबळ, कचरा व्यवस्थापनातील घोटाळे अशा अनेक मुद्द्यांवर दोघांनी वेगवेगळ्या संसदीय साधनांचा वापर करून सरकारचे लक्ष वेधले. दोघेही माजी महापौर असल्याने शहराच्या प्रश्नांची सखोल जाण ही या एकमतामागची कारणे मानली जात असली तरी, राजकीय वर्तुळात या ‘सुरां’मागे वेगळ्या समीकरणांची चर्चा रंगली आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे निकटवर्तीय मानले



जाणारे महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक ब्रिजेश दीक्षित यांचा मुद्दा पुन्हा विधानसभेत चर्चेत आला. महा-मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक असताना नागपूर मेट्रो प्रकल्पात आर्थिक अनियमिततेबाबत कॅगने ठपका ठेवला होता. या प्रकरणी विकास ठाकरे यांनी राज्य व केंद्र सरकारकडे तक्रार केली होती. त्यानंतर दीक्षित यांची मेट्रोतून बदली करण्यात आली आणि त्यांना नव्या पदावर नेमण्यात आले. आता ठाकरे यांनी पुन्हा त्यांच्या कामकाजावर आक्षेप घेतला आहे. कोणतीही सरकारी मंजुरी न घेता कामे सुरू करण्याची त्यांची पद्धत पुन्हा वादग्रस्त ठरत आहे. इमारतींवर उभारल्या जाणाऱ्या मोबाईल टॉवरचा मुद्दा प्रवीण दटके यांनी विधानसभेत उपस्थित केला. नियम व कायदे डावलून टॉवर उभारले जात असून, त्यावर कारवाई करण्याचे अधिकार महापालिकेकडे नाहीत, एवढेच नव्हे तर त्यांच्याकडून कर वसुलीही करता येत नाही, अशी गंभीर बाब त्यांनी निदर्शनास आणली. या पार्श्वभूमीवर सरकारने याबाबत स्वतंत्र धोरण तयार करण्याची गरज मान्य करत तशी घोषणा केली.

## संस्कृत सुभाषित

आत्मानमेव मन्येत कर्तारं सुखदु:खयो:।
तस्माच्छ्रेयस्करं मार्ग प्रतिपद्येत् न त्रसेत्।।

अर्थ : आरोग्य आणि आजार, सुख आणि दु:ख यांचे निर्माते आपणच असतो. म्हणून इष्ट व श्रेयस्कर मार्गच नेहमी स्वीकारावा म्हणजे त्रास होत नाही.

## गुरु वचन



### यश गाठायचे असेल तर स्वयंशिस्त हवीच

ज्याप्रमाणे आग आपल्या उष्णतेच्या साहाय्याने सोन्याला उजळून टाकते, अगदी त्याचप्रमाणे स्वयंशिस्त कोणत्याही तरूणाचे व्यक्तिमत्त्व चमकविण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. स्वयंशिस्त बाळगणाऱ्या तरूणाची पावलं नेहमी यशाकडे वेगाने सरकत असतात; पण ही स्वयंशिस्त म्हणजे नेमके काय तर ही स्वयंशिस्त म्हणजे आपली पावलं योग्य दिशेकडे वळविणे. स्वयंशिस्तीमुळे तुम्ही कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीत टिकून राहू शकता. डगमगून न जाता धैर्याने, संकटाचा सामना करू शकता. मात्र स्वयंशिस्त अंगी बाणण्यासाठी गरज असते ती आळस आणि सुखाचा त्याग करण्याची! स्वयंशिस्त लावून घेतल्याने कोणी लहान होत नाही. एकदा का आपण स्वत:ला शिस्त लावून घेतलीत की, तुमच्या व्यक्तिमत्त्वात आणि जीवनात बदल झालाच म्हणून समजा. यामुळे तुम्हाला नैतिक छळ आणि निरोगी आरोग्य लाभते, ते वेगळेच.


## उपदेशकथा

एका विहिरीजवळ एक मुलगा खेळत होता. वाटेने एक चोर जात होता. चोराला पाहिल्याबरोबर मुलगा रडायला लागला. तेव्हा चोराने त्याला विचारले, काय रे? काय झाल? तो मुलगा म्हणाला, आई मला आता मारणार. कारण माझा चांदीचा गडू या विहिरीत पडला.

काही काळजी करू नकोस. मी तुझा गडू काढून देतो असे म्हणून चोराने कपडे काढले आणि तो विहिरीत उतरला. आपल्याला सहज चांदीचा गडू पचवता येईल. या विचाराने तो खुश झाला होता. विहिरीचा तळ गाठून चोराने गडू शोधण्याचा प्रयत्न केला. पण त्याला तो गडू सापडलाच नाही. कारण गडू विहिरीत पडलाच नव्हता. अखेर निराश होऊन तो कुडकुडत वर आला. पाहतो तो काय तो मुलगा गायब आणि सगळे गावकरी हजर अशा तऱ्हेने चोर सापडला.

कथा उपदेश : तल्लख बुद्धीचा वापर केल्याने धोका टळतो.

## पंचांग



| पंचांग | सूर्य:मीन |
|---|---|
| ३० मार्च २०२६ | चन्द्र:सिंह |
| सोमवार | हिजरी सन् – १४४६ |
| विक्रम संवत्– २०८२ | मुस्लिम मास – शव्वाल |
| चैत्रशके संवत्– १९४७ | तारीख – १० |
| संवत्सर – पराभवनाम | विशेष |
| अयन– उत्तरायणारंभ | सोमप्रदोष |
| मास– चैत्र | अनंग त्रयोदशी |
| ऋतु– सौर वसंत | अमनंगव्रत |
| शुक्ल पक्ष | जयाजी महाराज यात्रा– |
| तिथि:द्वादशी ०७:०९:५३ | हिरपूर (मूर्तिजापूर ) |
| नक्षत्र:मघा १४:४७:४१ | अवलियाबाबा जयंती |
| योग:शूल १६:५०:४५ | – उमरामोठा (वाशिम) |
| करण:बालव ०७:०९:५३ | महादेव यात्रा – सिंदखेड |
| करण:कौलव १९:००:०६ | (अकोला) |

## दै. ‘संध्या’ धमाल सूडोकु क्र. १०२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2 | | 3 | | | 7 | | 5 |
| 5 | 6 | | | 1 | | 2 | | 9 |
| | | | | | | | 6 | |
| 4 | 3 | | | 2 | | | | 7 |
| 1 | | 8 | 9 | | 4 | 5 | | 6 |
| 6 | | | | 8 | | | 3 | 1 |
| | 8 | | | | | | | |
| 3 | | 7 | | 4 | | | 1 | 2 |
| 9 | | 4 | | | 3 | | 5 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १०१ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 4 | 5 | 3 | 2 | 1 | 7 | 6 |
| 6 | 5 | 1 | 7 | 4 | 9 | 2 | 3 | 8 |
| 2 | 3 | 7 | 8 | 1 | 6 | 4 | 9 | 5 |
| 3 | 6 | 9 | 2 | 8 | 4 | 5 | 1 | 7 |
| 5 | 1 | 2 | 9 | 7 | 3 | 8 | 6 | 4 |
| 4 | 7 | 8 | 6 | 5 | 1 | 3 | 2 | 9 |
| 9 | 2 | 5 | 3 | 6 | 8 | 7 | 4 | 1 |
| 7 | 4 | 3 | 1 | 9 | 5 | 6 | 8 | 2 |
| 1 | 8 | 6 | 4 | 2 | 7 | 9 | 5 | 3 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- २००७ – पश्चिम आफ्रिका देश गिनीमध्ये समुद्र तटापासून काही अंतरावर एक नाव उलटून ६० जणांचा मृत्यू झाला.
- २००७ – बांगलादेशात २००५ मधील बॉम्बस्फोट मालिका आणि दोन न्यायधीशांच्या हत्येच्या प्रकरणात दोषी ठरलेल्या जमातुल मुजाहिदीनच्या सहा अतिरेक्यांना फाशी देण्यात आली.

### राष्ट्रीय

- १९१९ – महात्मा गांधींने रोअल्ट ॲक्ट विरुद्ध आंदोलनाची घोषणा केली.

### आंतरराष्ट्रीय

- २००७ – ओरिसाच्या तटाजवळ बंगालच्या खाडीत एक नौसेनेच्या जहाजाच्या माध्यमातून जमिनीवरुन जमिनीवर मारा करणाऱ्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्र धनुष्यची यशस्वी चाचणी करण्यात आली.
- २००७ – भारतीय फिरकीपटू अनिल कुंबळेने एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली.

### जन्म

- १४३२ – तुर्कीचे सुलतान मेहमेद दुसरा (फतेह) यांचा जन्म.
- १७४६ – फ्रांसिस गोया, स्पॅनिश चित्रकाराचे जन्म.
- १८३२ – व्हिंसेंट व्हान गॉ, डच चित्रकाराचे जन्म.

### निधन

- १६६५ – मुरारबाजी देशपांडे, छत्रपती शिवाजी महाराज यांचे विश्वासू सरदार(रणमरण) यांचे निधन.
- १९४४ – सर चार्ल्स व्हर्नान बॉयस, विख्यात ब्रिटिश पदार्थविज्ञानशास्त्रज्ञाचे निधन.
- १९७६ – रंगसम्राट रघुवीर शंकर मुळगावकर, प्रख्यात चित्रकाराचे निधन.
- १९९३ – एस. एम. पंडित, भारतीय चित्रकाराचे निधन.

## : SMS :

Introducing T20 format in exams
*Reduce exam time by 1hr and marks by 50
*Introduce breaks after each 15 minutes
*Give free hit marks for unexpected questions
*first 30 mins power play no supervisor in the class
*Cheer girls in every class they will dance when we take an additional sheet!!

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| पुणे | ३२.६ | २०.४ |
| पंढरपूर | ३७ | २४.५ |
| सातारा | ३४.३ | १८.५ |
| सांगली | ३५.४ | २३.३ |
| सोलापूर | ३७ | २५.२ |
| वर्धा | ३७.३ | २२.२ |
| वाशिम | ३५.६ | २१.८ |
| यवतमाळ | ३६.४ | २३.८ |
| औरंगाबाद | ३४.५ | २१.४ |
| अहमदनगर | ३४.४ | २१.४ |
| अकोला | ३६.६ | २२.९ |
| अमरावती | ३६.७ | २१.३ |
| बीड | ३८.२ | २५.८ |
| भंडारा | ३७.१ | २१.६ |
| बुलढाणा | ३०.८ | १८.१ |
| चंद्रपूर | ३७.५ | २६.९ |
| चेन्नई | ४०.६ | २५.३ |

## आजचे राशिभविष्य



**मेष :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पश्चिम दूरदर्शिपणामुळे व चातुर्यामुळे अनेक अडचणी पार पडतील.

**तुळ :** शुभ रंग : जांभळा, शुभ दिशा: उत्तर मुलांच्या प्रगतीचे योग आहेत. कामात अनुकूल परिस्थिती निर्माण होईल.

**वृषभ :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: दक्षिण योजनेनुसार काम केल्यास फायदा होईल. आई वडिलांशी असलेले संबध दृढ होतील.

**वृश्चिक :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा:पश्चिम प्रसन्न वातावरण असल्यामुळे आपण केलेले प्रयत्न यशस्वी राहतील. चोरी किंवा नुकसान होण्याची शक्यता आहे.

**मिथुन :** शुभ रंग: गुलाबी: शुभ दिशा: दक्षिण नवीन योजना फायदेशीर राहतील. मानसिक तणावापासून मुक्ति मिळेल.

**धनु :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: उत्तर आपल्या कामाची लोक स्तुती करतील. विचारपूर्वक काम केल्यामुळे कामकाजाची स्थिती भक्कम होईल.

**कर्क :** शुभ रंग: पांढरा: शुभ दिशा: उत्तर व्यवसायात यश मिळेल. अडकलेला पैसा मिळेल. अधिक विश्वास दाखवून कामे करू नका.

**मकर :** शुभ रंग: पांढरा: शुभ दिशा: पश्चिम रोजगारामध्ये बदल किंवा नवीन संधी मिळतील. प्रत्येक कामात आपल्याला यश मिळेल.


**सिंह :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा:पश्चिम नशिबावर सोडून दिलेले कामे पार पडतील. आर्थिक फायदा होईल. वेळेवर घेतलेले निर्णय फायदेशीर राहतील.

**कुंभ :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: दक्षिण आर्थिक तंगी वाढल्याने व कौटुंबिक अडचणीमुळे मानसिक स्थिती चांगली राहणार नाही.

**कन्या :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: उत्तर निंदा करण्यापासून दूर रहा. कामकाजात निर्माण झालेल्या अडचणीमुळे निराश रहाल.

**मीन :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: दक्षिण आपले प्रयत्न यशस्वी होतील. सन्मान व किर्तीत वाढ होईल. खर्च विचारपूर्वक करा. सरकारी कामे पार पडतील.

## ‘दै. संध्या’ जम्बो शब्दकोडे क्र. १०२



### आडवे शब्द

१. सत्तेचा खेळ
४. ‘ज्याने चोच दिली -- -- देईल’ (म्हण)
७. पर्ण
९. कूर्म
१२. उष्ण
१४. बाहक भीती निर्माण करणाऱ्या दोन छायाग्रहांपैकी एक
१५. दुसऱ्याच्या मनातील भाव ओळखणारा
१८. पृथ्वी
१९. घाई, निकड
२१. पोपटासारखे नाक
२२. हावरटपणा
२४. मराठीत परमेश्वर, हिंदीत हिरवट, इंग्रजीत घाई
२५. फळातील द्रव
२७. युद्ध
२९. वर्ष (ग्रा.)
३२. फार मोठा फायदा
३५. मर्कट
३७. अखेर, शेवट
३८. कीर्तनकार
४१. घराण्याचे नाव कलंकित करणारा
४४. संरक्षक भिंत
४५. फुरसत
४७. लग्न म्हणजे दोनाचे – हात!
४८. लहान मुलांची शाळा
५१. दणकट
५३. रममाण, निमग्न
५५. दृष्टीभेट
५७. सरस्वतीचे एक नाव
५८. नमस्कार
६०. चणचण, न्यूनता
६३. आरास
६५. पोट
६६. हिंदीत श्रावण महिना
६७. अदबशीरपणा
६८. होडी
६९. एक श्वासरोग
७१. गोदाम
७३. चंद्र
७४. सैन्य
७६. एकरूप
७८. झाडावरून गळलेले, माघार
८०. पुढारी, नेता
८२. पक्षी
८३. लाकडी जिना
८४. किरकोळ सामान
८६. घोड्याचे पायताण
८७. मंत्रीमंडळ
८८. चिवट
८९. टिंगल, चेष्टा
९०. वितरण

### उभे शब्द

१. संताप
२. भरजरी
३. ‘इडली आणि ऑर्किड’ चरित्र या उद्याजकाचे– ’विठ्ठल ---’
४. नखरा
५. सर्वत्र
६. मनाचे ोक लिहिणारे संत
७. साखरेचा रस
८. आश्चर्य
१०. पातळसर
११. व्रत
१४. मातीचा कण
१६. मऊ
१७. मच्छर
२०. कोवळा अंकुर
२३. अंगावरील बारीक केस
२४. आक्षेप
२६. मनाला लागलेली टोचणी
२८. रमापती
३०. सडपातळ
३१. कुबड
३३. गालफड आत गेलेला
३४. स्तुती
३६. मणका
३९. सरळ, न थांबता
४०. अस्वल
४२. मिंधा
४३. वर्ष, सन
४६. चेहरा, मुख
४८. गोणपाट, पोते
४९. उत्तराधिकारी
५०. संध्याकाळ
५१. डोंगराची काळी मैना
५२. खोदकाम
५३. अनुमती
५४. नुकतेच जन्मला आलेले
५६. कणखर, रांगडा
५९. प्रत्येक दिवशी
६१. माकडांची टोळी
६२. एक तारवाद्य
६४. वरपांगी, दिखाऊ
६५. पार्वतीचे एक नाव
६६. सामन्यातील पराक्रमी
६९. किंमत, प्रत्येक
७०. अफूचे बीज
७२. लोकसभेच्या सदस्य
७३. विपत्तीची कहाणी
७५. सर्वनाश, नेस्तनाबूत
७७. सुसर
७८. उद्याच्या नंतरचा दिवस
७९. पादत्राण
८१. केस रंगवण्याचे साधन
८४. आंचळ
८५. भेग, चिर, सापट

### जम्बो शब्दकोडे क्र. ९०१ चे उत्तर

आडवे उत्तर १.हनुमान ५.लाकडी ८.संताप ११.कमालकिमान १३.समरांगण १५.वासा १६.वार्ताहर १७.परत १८.तानसेन २१.वाळू २३.माला २४.नामवंत २६.हरिभक्तपरायण २८.रचना २९.राणी ३०.पाट ३२.नशा ३३.कात ३५.पाक ३६.पंकज ३७.खोपट ३८.अंतरपाट ३९.परकर ४१.संप्रदाय ४२.आसमान ४४.जनक ४५.सरबत ४६.रहित ४७.जननमरण ५०.मादक ५२.खार ५४.गाढव ५५.थापी ५६.गजरा ५७.शेरास सवाशेर ५९.सणक ६०.पाव ६१.दावा ६२.थर ६४.नाखवा ६५.रनवे ६६.जळाऊ ६७.नस

उभे उत्तर : १.नुकसान ३.मामा ४.नल ५.लामा ६.कनवाळू ७.समर ८.संगत ९.ताण १०.खडतर १२.किल्ली १३.सहचारिणी १४.घर १५.वातावरण १७.पलायन १९.सेनानायक २०.नम २१.वात २२.रक्तपात २३.मारा २५.वंदन २६.हरमाखोर २७.पट ३१.सकटनिकट ३३.काटकसर ३४.बातमी ३५.पापा ३६.पंतप्रधान ४०.रणरण ४३.माहितगार ४३अ.नत ४४.जलद ४५.सरतेशेवटी ४७.जनगणना ४८.नवरा ५०.मावसभाऊ ५१.कथाकथन ५२.खासदार ५३.रसवान ५८.शेपू ६३.रस

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा अर्थसंकल्प तुटीत

पुणे (दैनिक संध्या) : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा सन 2026-27 या आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प 4 कोटी 32 लाख 71 हजार रुपयांच्या तुटीसह सादर करण्यात आला. अर्थसंकल्पानुसार विद्यापीठाचे एकूण अपेक्षित उत्पन्न 619 कोटी रुपये असून, खर्चाचा अंदाज 624 कोटी रुपये इतका आहे. निर्माण झालेली तूट विद्यापीठाच्या निधीवर टाकण्यात आली आहे. राज्य शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानात अपेक्षित वाढ न झाल्याने उत्पन्नवाढ मर्यादित राहिली आहे. अर्थसंकल्पातील नियमित खर्चामध्ये वेतन, निवृत्तिवेतन, परीक्षा व मूल्यमापन आणि प्रशासकीय खर्च यांचा मोठा वाटा आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात संशोधन आणि नवोपक्रमावर विशेष भर देण्यात आला आहे. युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट रिसर्च फंड, संशोधन संवर्धन योजना, प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस आणि आंतरराष्ट्रीय अतिथी प्राध्यापक योजना, यांसाठी निधी देण्यात आला आहे. पायाभूत सुविधांसाठी माहिती तंत्रज्ञान सुविधा, स्मार्ट कॅम्पस, सीसीटीव्ही देखरेखव्यवस्था आणि विभागांचे आधुनिकीकरण, यासाठी तरतूद करण्यात आली आहे. विद्यार्थी कल्याणासाठी सुरक्षा विमा, कौशल्य विकास, सांस्कृतिक व क्रीडा उपक्रम तसेच समर्थ भारत अभियान यांसाठीही निधी राखीव ठेवण्यात आला आहे.

### पुणे महानगर क्षेत्राच्या विकासासाठी 'ग्रोथ हब प्लॅन'ला गती

पुणे (दैनिक संध्या) : पुणे महानगर क्षेत्र अर्थात् 'PMR ग्रोथ हब प्लॅन' अंतर्गत मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होणार आहे. निती आयोगाकडून सुमारे ४० हजार कोटी रुपयांच्या निधीला मान्यता मिळाली आहे. या योजनेमुळे पुणे महानगर क्षेत्राच्या विकासाला मोठी चालना मिळेल, असे आश्वासन राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सभागृहात दिले. महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या समारोपाच्या दिवशी पुणे मेट्रोपोलिटन रिजन (PMR) च्या सर्वांगीण विकासाचा मुद्दा जोरकसपणे मांडत आमदार महेश लांडगे यांनी राज्य शासनाचे लक्ष वेधले. पुणे महानगर क्षेत्र हे राज्याच्या आर्थिक विकासाचे प्रमुख केंद्र असून, त्यासाठी दीर्घकालीन आणि शाश्वत नियोजनाची आवश्यकता असल्याची मागणी सभागृहात केली. आमदार लांडगे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली PMR क्षेत्रात मेट्रो विस्तार, रिंगरोड, मल्टिमोडल ट्रान्सपोर्ट हब, नदी संवर्धन आणि औद्योगिक सुविधा यांसारख्या विविध प्रकल्पांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रगती होत असल्याचे त्यांनी नमूद केले. PMRDA, MahaMetro, PMPML आदी यंत्रणा समन्वयाने काम करत असून शहरी व ग्रामीण भागात नागरी सुविधा उभारल्या जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

### नागरिकांमध्ये घबराट निर्माण केल्याप्रकरणी हायवे पेट्रोलियम सेंटरचा इंधन पुरवठा स्थगित

पुणे (दैनिक संध्या) : इंधन उपलब्धतेबाबत अप्रमाणित माहिती पसरवून नागरिकांमध्ये घबराट निर्माण केल्याप्रकरणी पुणे कॅन्टोनमेंट परिसरातील हायवे पेट्रोलियम सेंटर (पूलगेट) या पेट्रोल पंपावरील विक्री व इंधन पुरवठा तात्काळ प्रभावाने स्थगित करण्यात आला आहे. तेल कंपनीकडून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, संबंधित पेट्रोल पंपाकडून पेट्रोल व डिझेल तुटवड्याबाबत निराधार अफवा पसरविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. ही बाब मार्केटिंग डिसिप्लिन गाईडलाइन्स (MDG) २०२४ अंतर्गत "गंभीर अनियमितता" (Major Irregularity) म्हणून गणली जाते. डीलरशिप करारातील अटींचे उल्लंघन झाल्याने संबंधित कारवाई करण्यात आली आहे. सध्याच्या परिस्थितीत तेल विपणन कंपन्यांकडून इंधनाचा पुरवठा सुरळीत सुरू असल्याबाबत जनजागृती केली जात असताना, अप्रमाणित माहिती प्रसारित केल्यामुळे इतर पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी व गोंधळ निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली होती. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू नये यासाठी ही कारवाई करण्यात आली आहे. सदर पेट्रोल पंप चालकास २४ तासांच्या आत लेखी स्पष्टीकरण सादर करण्याचे निर्देश देण्यात आले असून, समाधानकारक उत्तर न मिळाल्यास डीलरशिप रद्द करण्यासह पुढील कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे तेल कंपनीच्या पुणे प्रादेशिक कार्यालयाकडून स्पष्ट करण्यात आल्याची माहिती जिल्हा पुरवठा कार्यालयाकडून देण्यात आली.




# श्रीरामराज्याभिषेक व पायघडी सोहळा तुळशीबागेत साजरा

## श्री रामजी संस्थान तुळशीबाग तर्फे आयोजन ; श्रीरामनवमी उत्सवाचे यंदा २६५ वे वर्ष

पुणे (दै. संध्या) :

श्रीराम जय राम जय जय राम... रघुपती राघव राजाराम, पतित पावन सीताराम... च्या अखंड गजरात प्रभू श्रीरामांच्या गाभा-यातील मूर्तीपासून पाऊले उमटलेली शुभ्रवस्त्रे तुळशीबाग श्रीराम मंदिराच्या सभामंडपात आली. पुणेकरांनी त्यावर फुलांची उधळण करीत श्रीरामराज्याभिषेक सोहळा उत्साहात साजरा केला. संपूर्ण भारतात पायघड्यांचा हा सोहळा पुण्यातील तुळशीबागेतील श्रीराम मंदिरात साजरा होतो.

श्री रामजी संस्थान तुळशीबाग च्यावतीने तुळशीबाग येथील श्रीराम मंदिरात लळीत पायघडीचे कीर्तन व श्रीराम राज्याभिषेकाच्या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. संस्थानचे कार्यकारी विश्वस्त डॉ. रामचंद्र तुळशीबागवाले, विश्वस्त भरत तुळशीबागवाले, कोटेश्वर तुळशीबागवाले, रामदास तुळशीबागवाले, श्रीपाद तुळशीबागवाले यांसह तुळशीबागवाले परिवार उपस्थित होता. पुणे प्रांताचे सरसुभेदार श्रीमंत नारो अप्पाजी तुळशीबागवाले यांनी सन १७६१ साली स्थापन केलेल्या देखण्या मंदिरामध्ये यंदाचे श्रीरामनवमी उत्सवाचे अखंडीत २६५ वे वर्ष साजरे होत आहे.



लळीत पायघडीचे कीर्तन सुरु असताना राज्याभिषेक सोहळा अनुभविण्यासोबतच रत्नजडित सिंहासन वरी शोभे रघुनंदन... ही पदे देखील तुळशीबागवाले कुटुंबियांकडून म्हणण्यात आली. कुटुंबातील सदस्य व कार्यकारी विश्वस्त डॉ. रामचंद्र तुळशीबागवाले यांच्या हस्ते श्रीराम राज्याभिषेक सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी उत्सवकाळातील मानक-यांचा सन्मान देखील करण्यात आला. कीर्तनकार ह.भ.प. दर्शन बुवा वझे यांचे कीर्तनही झाले.

डॉ. रामचंद्र तुळशीबागवाले म्हणाले, श्रीरामजन्मानंतर पायघड्यांचा हा सोहळा फक्त तुळशीबागेतील राम मंदिरात साजरा केला जातो. नविन पांढ-या शुभ्र वस्त्रावर श्रीरामांच्या पावलांचे ठसे उमटविले जातात आणि हे वस्त्र गाभा-यापासून सभामंडपापर्यंत आणले जाते. यावेळी लळीत पायघड्यांचे कीर्तन करण्यात येते. त्यानंतर श्रीरामांचा राज्याभिषेक सोहळा संपन्न होतो. सोहळ्यानंतर उत्सवकाळातील मानक-यांचा पुष्पहार व श्रीफळ देवून सन्मान करण्यात येतो, असे ही त्यांनी सांगितले.

# हिंजवडीतील गॅस एजन्सीवर कारवाई; सिलिंडर विक्रीवर बंदी

पुणे (दै. संध्या) :

बेकायदा आणि चढ्या दराने गॅस सिलिंडर विकल्याप्रकरणी हिंजवडी येथील मे. श्री लक्ष्मी भारत गॅस या एजन्सीवर जिल्हा प्रशासनाने कारवाई केली आहे. एजन्सीला तत्काळ पुरवठा बंद करण्याचे आदेश देण्यात आले असून, वितरणाचा परवाना देखील रद्द करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी महेश सुधळकर यांनी दिली. जिल्ह्यातील ही पहिलीच कारवाई ठरली आहे.वृत्तपत्र सदस्यता

या एजन्सीकडे भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडमार्फत व्यावसायिक एलपीजी सिलिंडर विक्रीचा अधिकृत परवाना आहे. मात्र, गुरुवारी (दि. 26) सिलिंडर वितरण करताना राज्य सरकारने



ठरवून दिलेल्या प्राधान्यक्रमाचे पालन न करता अनधिकृत व नोंदणी नसलेल्या व्यक्तींना सिलिंडर वाटप केल्याचे आढळले. तसेच अधिक नफा मिळविण्याच्या उद्देशाने जादा दराने सिलिंडर विक्री केल्याचेही निदर्शनास आले आहे.

या प्रकारामुळे नागरिकांमध्ये एलपीजी पुरवठ्याबाबत गैरसमज निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी तत्काळ कारवाईचे निर्देश दिले. त्यानुसार संबंधित एजन्सीचा परवाना निलंबित करण्यात येत आहे.

तसेच, या आदेशांची तातडीने अंमलबजावणी करून त्याबाबतचा अनुपालन अहवाल सादर करावा, असे निर्देश जिल्हा पुरवठा अधिकारी महेश सुधळकर यांनी भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड यांना दिले आहेत.

# आयुकातील शास्त्रज्ञांचा मोठा शोध; विश्व मोजण्यासाठी 'शिअर रेशियो' पद्धत

पुणे (दै. संध्या) :

पुणे: बह्मांडाचा प्रचंड पसारा मोजण्यासाठी पुण्यातील आयुका (खगोल भौतिकशास्त्रीय आंतरविद्यापीठ केंद्र) या संस्थेतील खगोल शास्त्रज्ञांनी एक भूमितीय चाचणी शोधून काढली आहे. खूप दूरवर असणाऱ्या आकाशगंगेचा अभ्यास करताना अभिनव भूमितीय पद्धत, 'शिअर रेशियो' ही नवी पद्धत शोधली आहे.

फार दूरवरच्या आकाश गंगांमधून येणाऱ्या अतिशय क्षीण प्रकाशाच्या आधारे विश्वाचा इतिहास, रचना उलगडण्याचा महत्त्वाचा प्रयत्न खगोलशास्त्रज्ञ करत आहेत. या आकाशगंगांचा प्रकाश पृथ्वीपर्यंत पोहोचताना जवळच्या आकाशगंगांच्या गुरुत्वाकर्षणामुळे तो वाकतो, विकृत होतो. या प्रक्रियेला 'गुरुत्वीय



लेन्सिंग' असे संबोधले जाते. या तंत्राच्या साहाय्याने विश्वातील पदार्थांचे, विशेषतः अदृश्य 'डार्क मॅटर'चे नकाशे तयार केले जातात आणि विश्वातील रचनांची वाढ कशी होते, याचा अभ्यास केला जातो.

या संशोधनात 'रेडशिफ्ट' ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची ठरते. विश्वाच्या प्रसरणामुळे प्रकाश किती ताणला गेला आहे, याचे मोजमाप म्हणजे रेडशिफ्ट. मात्र, यातील अनिश्चिततेमुळे विश्वाच्या विविध वैश्विक परिमाणांच्या मोजमापात निर्माण होण्याची शक्यता असते. प्रत्येक आकाशगंगेचा अचूक रेडशिफ्ट मोजणे वेळखाऊ असल्याने, शास्त्रज्ञ प्रामुख्याने आकाशगंगांच्या रंगांवरून त्याचा अंदाज लावतात. ही पद्धत पूर्णतः अचूक नसून, त्यात त्रुटी राहतात. आयुकातील खगोलशास्त्रज्ञांनी याच समस्येवर उपाय म्हणून एक अभिनव भूमितीय पद्धत, 'शिअर रेशियो'चा वापर केला आहे. नेदरलँडमधील लाईडन विद्यापीठातील संशोधक डॉ. दिव्य राण, प्रा. सुहृद मोरे संशोधक, आयुका, पुणे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आंतरराष्ट्रीय नियतकालिकात यासंदर्भातील संशोधन नुकतेच प्रसिद्ध केले आहे.

# पुणे महापालिकेने राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला

पुणे (दै. संध्या) :

राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या स्पर्धेत पुणे महालिकेने राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. विविध तांत्रिक आणि प्रशासनिक निकषांवर झालेल्या मूल्यमापनात महापालिकेला २०० पैकी १८६.२५ गुण मिळाले. या यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या उपस्थितीत अतिरिक्त महापालिका आयुक्त पवनीत कौर यांनी पुरस्कार स्वीकारला.

राज्यातील विविध शासकीय कार्यालयांमध्ये प्रशासन अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्याच्या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

यामध्ये कार्यालयांची संकेतस्थळे, 'आपले सरकार' प्रणाली, ई-ऑफिस, कार्यालयीन डॅशबोर्ड, व्हॉट्सअॅप चॅटबॉट, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) व ब्लॉकचेनचा वापर, तसेच भू-स्थानिक माहिती प्रणाली (जीआयएस) यांसारख्या सात प्रमुख घटकांवर कामगिरीचे



मूल्यमापन करण्यात आले. राज्यातील २९ महापालिकांचा यात समावेश होता.

महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर, पृथ्वीराज बी. पी. तसेच ओमप्रकाश दिवटे यांच्या नेतृत्वात ई-गव्हर्नन्स क्षेत्रात विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित नवे संकेतस्थळ विकसित करणे, ऑनलाइन सेवा पोर्टलची उभारणी, तक्रारींचे विश्लेषण व व्यवस्थापन प्रणाली विकसित करणे, तसेच व्हॉट्सअॅपद्वारे नागरिकांना सेवा आणि माहिती उपलब्ध करून देणे यांचा समावेश आहे.

तसेच, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि जीआयएस आधारित प्रकल्पांचा वापर विविध विभागांमध्ये सुरू करण्यात आला आहे. यामुळे निर्णयप्रक्रिया अधिक वेगवान आणि अचूक होण्यास मदत होत असल्याचे प्रशासनाने दावा केला आहे.

या सर्व उपक्रमांच्या अंमलबजावणीत महापालिकेतील सर्व विभागांचा सहभाग होता. विशेषत: माहिती व तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख राहुल जगताप यांच्या नेतृत्वाखाली या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली.

# पुणे विमानतळावर 77 कोटींचा हायड्रोपोनिक गांजा जप्त

पुणे (दै. संध्या) :

पुणे विमानतळावरील मालवाहतूक विभागात सीमाशुल्कच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने धडक कारवाई करत तब्बल 76 किलो 580 ग्रॅम हायड्रोपोनिक गांजा जप्त केला. या साठ्याची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत सुमारे 77 कोटी रुपये असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

याप्रकरणी नवी मुंबईतील व्यावसायिक समीर सुरेश अष्टेकर (वय 58) याला अटक करण्यात आली आहे. या कारवाईमुळे अवघ्या चार दिवसांपूर्वी प्रसिद्ध केलेल्या वृत्तावर शिक्कामोर्तब झाले आहे. थायलंडमध्ये अलीकडेच लागू झालेल्या निर्बंधांमुळे गांजाच्या तस्करीत वाढ होत असल्याची बातमी प्रसिद्ध केली होती. त्याच पार्श्वभूमीवर आता थायलंडमधूनच कोट्यवधींचा गांजा पुण्यात उतरवण्याचा प्रयत्न उघड झाल्याने आंतरराष्ट्रीय रॅकेट किती खोलवर रुजले आहे, हे स्पष्ट झाले आहे.

सीमाशुल्क विभागाला थायलंडवरून आलेल्या 45 बॉक्सच्या मालाबाबत संशय आला. कागदपत्रांवर हा माल 'मँडरिन संत्र्याचे तुकडे' असा दाखवण्यात आला होता. मात्र, अधिकाऱ्यांना काही तरी संशयास्पद वाटल्याने पंचांच्या उपस्थितीत तपासणी सुरू करण्यात आली. एक्स-रे तपासणीतच मालातील विसंगती स्पष्ट झाली. बॉक्स उघडल्यावर त्यात चांदी रंगाचे डबे आणि त्यामध्ये हवाबंद पिशव्या आढळल्या. या पिशव्यांमध्ये हिरवट रंगाचा, तीव वासाचा पदार्थ भरलेला होता. चाचणी घेतली असता तो उच्च प्रतीचा हायड्रोपोनिक गांजा असल्याचे निष्पन्न झाले.

कस्टम विभागाच्या वतीने विशेष सरकारी वकील ऋषीराज वाळवेकर यांनी बाजू मांडली. या प्रकरणाचा तपास अद्याप सुरू असून, या आंतरराष्ट्रीय तस्करी साखळीतील इतर साथीदारांचा शोध सुरू आहे. दरम्यान, एवढ्या मोठ्या प्रमाणावर गांजा पुण्यात उतरवण्याचा प्रयत्न झाल्याने विमानतळावरील सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. सीमाशुल्क विभागाच्या या कारवाईमुळे मात्र मोठ्या तस्करीला बेक लावण्यात यश आले आहे.

# शालेय मुलींसाठी गर्भाशयमुखाच्या कर्करोगाविरुद्ध मोफत प्रतिबंधात्मक लसीकरण मोहिमेची सुरुवात

पुणे (दै. संध्या) :

भारतातील महिलांमध्ये गर्भाशयमुखाचा कर्करोग हा दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक आढळणारा कर्करोग असून, तो एक गंभीर सार्वजनिक आरोग्य समस्या आहे. २०३० पर्यंत हा कर्करोग निर्मूलन करण्याच्या जागतिक उद्दिष्टाच्या दिशेने पुण्यात एक महत्त्वपूर्ण उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

रोटरी क्लब ऑफ पुणे डाउनटाउन यांनी जीविका फाउंडेशनच्या सहकार्याने ९ ते १४ वयोगटातील मुलींसाठी मोफत (ह्युमन पॅपिलोमा व्हायरस) लसीकरण प्रकल्प सुरू केला आहे. या उपक्रमाचा उद्देश जागरूकता निर्माण करणे आणि वेळेवर लसीकरणाद्वारे गर्भाशयमुखाच्या कर्करोगापासून संरक्षण सुनिश्चित करणे हा आहे.

या उपक्रमाचे उद्घाटन पुणे कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या कन्याशाळेत करण्यात आले. या प्रसंगी ३८ शालेय मुलींना एचपीव्ही लस देण्यात आली आणि या आरोग्य मोहिमेची औपचारिक सुरुवात झाली. कार्यक्रमास रोटरी डायरेक्टर डॉ. झिम्रा इस्रायल, सचिव रोटेरियन परवीन सडेकर रोटेरियन पुंडलिक कुडवा, अॅन विद्या कुडवा, रोटेरियन गौतम इदनानी, डायरेक्टर डॉ. समीर गोसावी, लोहिया जैन ग्रुपच्या संचालिका रिद्धी जैन, जीविका फाउंडेशनचे संचालक श्री. जिग्नेश पटेल, तसेच प्राची डालू, प्रतीमेश, ऐश्वर्या, पुणे कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष वालचंदजी संचेती, डॉ. प्रवदा तेलंग, मुख्याध्यापिका सौ. बडदाळ, महाजन सी.बी. आणि उपमहापौर पुरुषोत्तम वाडेकर यांचे प्रतिनिधी श्री. विलास जाधव उपस्थित होते.

पाहुण्यांचे स्वागत करताना डॉ. झिम्रा इस्रायल यांनी सांगितले की," पोलिओ आणि गोवरसारख्या आजारांविरोधातील बालपणीच्या लसीकरणाला भारतात मोठ्या प्रमाणावर स्वीकारण्यात आल्या आहे. मात्र किशोरवयीन व प्रौढांसाठीच्या लसींबाबत जागरूकता कमी असून सुरक्षिततेबाबत गैरसमज आहेत. त्यांनी प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले,"गर्भाशयमुखाच्या




कर्करोगाबाबत जागरूकता निर्माण करणे आणि प्रतिबंधात्मक लसीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे.या उपक्रमाद्वारे आम्ही मुलींचे आरोग्य सुरक्षित करण्याचा आणि निरोगी भविष्यासाठी योगदान देण्याचा प्रयत्न करत आहोत."

त्यांनी पुणे महानगरपालिका (PMC), जीविका फाउंडेशन आणि लोहिया जैन ग्रुपचे श्री. पुरुषोत्तम लोहिया यांचे सहकार्य व योगदानाबद्दल आभार मानले. जीविका फाउंडेशनचे श्री. जिग्नेश पटेल यांनीही याच भावना व्यक्त केल्या.

यावेळी बोलताना लोहिया जैन ग्रुपच्या संचालिका सौ. रिद्धी जैन म्हणाल्या, "आमचा व्यवसाय घरे बांधण्याचा असला तरी आमचे मुख्य ध्येय सामाजिक कार्य आहे. या अर्थपूर्ण लसीकरण मोहिमेचा भाग होताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे." हा उपक्रम मुलींच्या आरोग्य संरक्षणासाठी आणि गर्भाशयमुखाच्या कर्करोग प्रतिबंधासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

# काशिनाथ फुलसुंदर यांचा तमाशा व्यवस्थापकाचा प्रवास




'चैत्र महिन्याला मराठीत वर्षाचा पहिला महिना म्हणून ओळखला जातो.' या महिन्यातच गुढीपाडवा सण मोठ्या आनंदाने महाराष्ट्र साजरा केला जातो.

या महिन्यात निसर्गात पालवी फुटते.चैतन्य निर्माण होते. झाडांना फुले फुलतात. हवामानात बदल होतो. चैत्र महिन्यात शेतकऱ्याची शेतीची कामे सर्व आटोपलेली असतात .शेतकरी राजा धनधान्याने समृद्ध झालेला असतो. ग्रामदैवताच्या जत्रा यात्रांना सुरुवात होते."गावची यात्रा म्हटली की, तमाशा हे समीकरण आहे"! ही अनेक वर्षाची परंपरा आहे.

लोककलेचे बाळकडू ज्यांना मिळाले. ते तमाशाचे ज्येष्ठ व्यवस्थापक काशिनाथ महादेव फुलसुंदर . जन्मगाव पिंपळवंडी तालुका जुन्नर जिल्हा पुणे .

खरे तर ! फुलसुंदर या घराण्याला वडील महादेव फुलसुंदरांपासून कलगी तुरा कलेचा वारसा लाभला. कलेचे बाळकडू हे काशिनाथ फुलसुंदर यांना प्राप्त झाले . वडील भेदिक लावण्याचा कार्यक्रम सादर करत. बहीण मंदाबाई खराडे या शाहिरी सादर करत. ऐतिहासिक कालखंड पोवाड्याच्या रूपाने सादर करणारी ही महिला महाराष्ट्रभर प्रसिद्ध आहे. आज पर्यंत विविध संस्था संघटनांनी 50 पुरस्कारांनी सन्मानित केले आहे. त्यामुळे कलेची अस्मिता ही बालपणापासून सतत होती. अशा या घराण्यात काशिनाथ फुलसुंदर जन्माला आले.

'जगण्याचे साधन नोकरी पाहिजे'. आणि आयुष्य आनंदी जगण्यासाठी कला पाहिजे".! नोकरीबरोबरच कलेची अस्मिता त्यांची कमी झाली नाही. कलेची नाळ त्यांची कायम राहिली.

वयाच्या 15 व्या वर्षापासून कलेच्या क्षेत्राशी निगडित आहेत. पिंपळवंडी येथे दरवर्षी नाटक सादर केले जात होते. या नाटकात ते सक्रिय सहभागी होत. नाटकात त्यांची गाजलेली भूमिका "कल्लू बेरड' अनेक वर्ष नाटक रसिकांच्या लक्षात राहिली होती

काशिनाथ फुलसुंदर हे पाटबंधारे खात्यात नोकरी करत असताना आणि सेवानिवृत्तीनंतरही तमाशा लोककला त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती.

तमाशा ही कला महाराष्ट्रात शतकांनो शतके चालत आलेली आहे." लोककला ही पारंपरिक लोकप्रिय झालेली आहे"

"तमाशा फक्त मनोरंजनाचे साधन नाही तर, गण गवळण बतावणी आणि वगनाट्य याच्यातून महाराष्ट्राची संस्कृती दिसते. लोककला समाजप्रबोधनाचे महत्त्वाचे साधन आहे." 'ग्रामीण जीवनाशी जोडलेली नाळ" म्हणजे तमाशा" ग्रामीण भाषेत, स्थानिक भाषेत, लोक भाषेत तमाशा कला ही सादर केली जाते" या तमाशा कलेच्या माध्यमातून केवळ मनोरंजन नाही .तर जाती भेदाच्या भिंतीही दूर केल्या जातात.

अशा लोककलेची आवड काशिनाथ फुलसुंदर यांना लहानपणापासून लागली. ती जपली. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी मनाशी निश्चय केला. की, यापुढे तमाशा रसिकांची सेवा करायची. यासाठी तमाशा क्षेत्रात व्यवस्थापक म्हणून त्यांचा प्रवास सुरू झाला.

संगीतरत्न दत्ता महाडिक पुणेकर यांच्या तमाशा फडातून व्यवस्थापकीय कामाची सुरुवात केली. चैत्र महिन्यात तमाशा पंढरी नारायणगाव येथे महाराष्ट्रातील तमाशा फडमालक हे तमाशा पंढरीत आपल्या राहुट्या दाखल करतात. आणि त्यामध्ये संगीतरत्न दत्ता महाडिक यांची सुद्धा राहूटी सालाबाद वर्षाप्रमाणेच असते. तमाशा ठरवायला आलेल्या गावकऱ्यांशी,कसे बोलावे?यात्रा कमिटीशी कसे बोलावे? कसा संवाद साधावा ?हे अनुभवातून शिकत गेले. मोठ्या फडातील अनुभव हा लहान तमाशा फडांचे व्यवस्थापन करण्यासाठी कामी आला.

सौ.मनीषा सिद्धटेककर, नंदाराणी भोकटे पुणेकर आणि या वर्षी जगनकुमार वेळवंडकर सह हौसाराणी पुणेकर या तमाशा फडाचे व्यवस्थापक म्हणून ते काम पहात आहेत.

काशिनाथ फुलसुंदर यांचा व्यवस्थापकाचा प्रवास हा वेगवेगळ्या तमाशा फडाच्या माध्यमातून झाल्याने गावकऱ्यांशी बोलणे, सुपर ठरवणे, त्यांच्याशी चर्चा करणे, असा स्वतःचा अनुभव ते इतर असणाऱ्या व्यवस्थापकांशी बोलतात. त्यामुळे इतर फडातील व्यवस्थापकांनाही त्याची माहिती होते.

तमाशा क्षेत्रातील जेष्ठ व्यवस्थापक म्हणून काशिनाथ फुलसुंदर यांच्याकडे पाहिले जाते. सध्या ते संगीताचा बादशहा जगनकुमार वेळवंडकर सह हौसाराणी पुणेकर या तमाशा फडाचे व्यवस्थापक म्हणून ते काम पाहतात.

यावर्षी या तमाशा फडाच्या 55 कलाकारांच्या संचात, गावाच्या पसंतीचा, 4 गाड्यांचा आणि 30 बाय 30 रंगमंच, आणि डॉल्बी साऊंड सिस्टिमच्या या संचाचे ते उत्तम नियोजन करताना त्यांच्या चेहऱ्यावरती आनंद आहे.

गुढीपाडव्यापासून सुरू झालेला तमाशा हंगाम. यावर्षी सर्व फड मालकांना ज्याप्रमाणे आनंदात गेला आहे .त्याप्रमाणे जगनकुमार यांनाही उत्तम गेला आहे.वेळवंडकर या तमाशा फडाला सुद्धा चांगल्या प्रकारची मागणी आणि रसिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. याचे समाधान काशिनाथ फुलसुंदर यांचे चेहऱ्यावर दिसते आहे.

तमाशा व्यवस्थापक म्हणून काम करताना ताण तणाव न घेता, स्वतः स्वीकारलेली जबाबदारी आणि त्यातून मिळणारा आनंद वेगळा असतो.

"कृष्णाच्या बासरीने फुले, फळे आणि निसर्ग भारावून जातो. त्या पद्धतीने चैत्र महिन्यात तमाशा पंढरी नारायणगाव येथे तमाशाच्या राहूट्यात व्यवस्थापनाचे काम करताना मन भारावून जाते.

गुढीपाडवा ते अक्षय तृतीया हा कालावधी कधी संपून जातो. हे कळत नाही आणि पुन्हा एकदा चैत्र महिन्याची आस लागते.

**- काशिनाथ आल्हाट**
**तमाशा अभ्यासक**
**तमाशा पंढरी नारायणगाव**
**8830857875**

## थोडक्यात पण महत्वाचे...

### विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी प्रत्येकाने खारीचा वाटा उचलावा : महेंद्रशेठ घरत



उरण (दैनिक संध्या) : "माझे शिक्षण रयत शिक्षण संस्थेत झाले. कर्मवीर भाऊराव पाटील यांची शिकवण आहे की, आपल्या ताटातील अर्धी भाकरी दुसऱ्याला द्या, मी आज तेच करतोय. खरोखर गरजवंत आहेत त्यांना मदतीचा हात कायम देत आलो आहे. शैक्षणिक कार्य, वारकरी, मंदिरांसाठी मदत करताना मी मागेपुढे पाहत नाही. सढळ हाताने देणगी देतो. त्यामुळे दिघोडे येथील ग्रामीण भागातील हायस्कूलसाठी २५ लाख रुपये देणार! ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षण सुविधा मिळणे आणि शिक्षण संकुल, ही काळाची गरज आहे. त्यामुळे माझी सर्वांना विनंती आहे की, विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी प्रत्येकाने खारीचा वाटा उचलावा, विशेषतः जे पदाधिकारी आहेत, त्यांची दिघोडे हायस्कूलसाठी मदत करणे ही त्यांची नैतिक जबाबदारी आहे. मी पहिल्यांदाच दिघोडे हायस्कूलमध्ये आलो आहे. त्याचा विचार करून मी हायस्कूलसाठी कुठलेही आढेवेढे न घेता मदत जाहीर करीत आहे," असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत दिघोडे येथे म्हणाले. महात्मा गांधी विद्यालय व दिवंगत रामदास ठाकूर कला उच्च माध्यमिक विद्यालय दिघोडे यांच्या वतीने दिवंगत रामदास ठाकूर यांचा २६ वा स्मृतिदिन हायस्कूलमध्ये साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत बोलत होते. यावेळी रायगड जिल्हा परिषद सदस्य डॉ. मनीष पाटील, सरपंच सुचिता ठाकूर, प्रेमनाथ ठाकूर, महेश कातकरी, संस्थेचे अध्यक्ष काशिनाथ पाटील, नारायण पाटील, गणेश पाटील, अविनाश पाटील, दीपक मढवी, चंद्रभागा पाटील, उज्वला थळी, परमानंद पाटील, ज्ञानप्रकाश पाटील, प्राचार्य संजय फल्ले आणि दिघोडे विभागीय शिक्षण संस्थेचे शिक्षकवृंद उपस्थित होते.

### सकाळी रंगली वजन गटाची लगबग; मैदानात प्रचंड धावपळ आणि चैतन्याचे वातावरण



सोलापुर (दैनिक संध्या) : सोलापुरात महाराष्ट्र महिला केसरी कुस्ती स्पर्धेचा महासंग्राम शनिवारपासून मोठ्या उत्साहात सुरू झाला. राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या 400 हून अधिक महिला खेळाडूंचे पहाटेपासूनच शहरात आगमन झाले. सकाळच्या सत्रात कुस्तीगीरांच्या वजनांची प्रक्रिया पार पडली, ज्यामुळे मैदानात प्रचंड धावपळ आणि चैतन्याचे वातावरण दिसून आले. सकाळी 9 वाजल्यापासून वजनांच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. पारदर्शकता राखण्यासाठी या स्पर्धेत आधुनिक इलेक्ट्रिक काट्याचा वापर करण्यात आला. पंच कमिटीतील 4 ते 5 तज्ज्ञ सदस्यांच्या देखरेखीखाली प्रत्येक खेळाडूचे वजन अचूकपणे नोंदवण्यात आले. आपल्या निर्धारित वजन गटात स्थान मिळवण्यासाठी खेळाडूंची लगबग पाहायला मिळाली. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सायंकाळी उद्घाटन झाले. तनुजा अनिल माळी हिने 14 वर्षाखालील शालेय कुस्ती स्पर्धेत देशात गोल्ड मेडल पटकावले. तनुजा ही सांगलीतील ज्ञानदा हायस्कूल येथे आठवी इयत्तेत शिकते. तिचे वडील शेती करतात.

### पाईपद्वारे नैसर्गिक गॅस जोडणीसाठी मिशन मोडवर मोहीम

**पुणे (दै. संध्या) :** पुणे जिल्ह्यातील उद्योगांना अखंडित आणि विश्वासार्ह ऊर्जा पुरवठा मिळावा यासाठी पाईपद्वारे नैसर्गिक गॅस (PNG) जोडणी शंभर टक्के पूर्ण करण्याच्या दृष्टीने "मागेल त्या उद्योगाला जोडणी" या तत्त्वावर मिशन मोडमध्ये विशेष मोहीम राबविण्यात येणार असल्याची घोषणा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केली. यासाठी संबंधित विभागांनी परस्पर समन्वय साधून विशेष कॅम्पचे आयोजन करावे, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आयोजित उद्योग आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार (दूरदृश्य प्रणालीद्वारे), जिल्हा पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल, अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत, अपर पोलीस आयुक्त रंजन शर्मा, पुणे महानगरपालिकेचे अपर आयुक्त ओमप्रकाश दिवटे, तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी संतोष भिसे, जिल्हा पुरवठा अधिकारी महेश सुधाळकर आणि विविध उद्योग संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. उद्योगमंत्री श्री. सामंत म्हणाले की, सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीत उद्योगांची उत्पादन क्षमता अबाधित राखणे ही राज्याच्या अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाची बाब आहे. नैसर्गिक गॅस हा उद्योगांसाठी स्वस्त, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक ऊर्जा स्रोत असल्याने कोणत्याही उद्योगाला केवळ गॅस जोडणीअभावी अडथळे निर्माण होऊ नयेत.

# एआय, डेटा आणि पारंपरिक ज्ञानाच्या समन्वयातून प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेला नवी दिशा




मुंबई (दै. संध्या) : 'वेलनेस आणि प्रतिबंधात्मक वैद्यकशास्त्रातील उदयोन्मुख तंत्रज्ञान कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित अचूक वेलनेसद्वारे अधिक लवकर आणि स्मार्ट प्रतिबंध' या विषयावर वैद्यकीय परिषद २०२६ मध्ये परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. पल्स वैद्यकीय दोन परिषदेचे जिओ वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

या सत्रात तज्ज्ञांनी स्पष्ट केले की, आरोग्य क्षेत्रात AI, डेटा आणि पारंपरिक ज्ञान यांचे एकत्रित व जबाबदारीने वापर केल्यास अधिक प्रभावी, अचूक आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा विकसित होऊ शकते. तज्ज्ञांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), डेटा आणि पारंपरिक वैद्यकीय ज्ञान यांच्या एकत्रित वापरावर भर दिला.

हॉलिस्टिक वेलनेसचे अध्यक्ष, संस्थापक व कोच डॉ. मिकी मेहता यांनी सांगितले की, आरोग्य क्षेत्रात तंत्रज्ञान, योग, ध्यान आणि पारंपरिक ज्ञान यांचे एकत्रीकरण आवश्यक आहे. मानवी अंतर्ज्ञान आणि जैविक प्रणालींचे महत्त्व कायम राहणार असून AI ही फक्त सहाय्यक साधन आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

हेल्थ इनोव्हेशन एक्स्चेंज चे सह-संस्थापक प्रदीप कक्कतील यांनी आरोग्य क्षेत्रातील वाढत्या बाजारपेठेचा आणि AI, वेअरेबल्स व डेटा-आधारित उपाययोजनांचा वेगाने होत असलेला विकास अधोरेखित केला. शासन खाजगी क्षेत्र, गुंतवणूकदार आणि तज्ज्ञ यांनी एकत्र येऊन दीर्घकालीन भांडवल व शाश्वत मॉडेल तयार करणे गरजेचे आहे. केवळ नफा किंवा 'युनिकॉर्न' होण्यावर लक्ष केंद्रित न करता सर्वसामान्यांसाठी उपयुक्त उपाय विकसित करणे महत्त्वाचे आहे.

हार्वर्ड मेडिकल स्कूल च्या शस्त्रक्रिया विषयातील व्याख्याता, कॅनोमिक्स इंक च्या मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) व सह-संस्थापक डॉ लीना प्रधान यांनी आयुर्वेदिक वनस्पती आणि घटकांच्या वैज्ञानिक पडताळणीवर भर दिला. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने वनस्पतींचा मानवी शरीरावर होणारा परिणाम जनुकीय (gene level) पातळीवर समजून घेणे आणि ग्राहकांना वैज्ञानिक माहिती देणे अत्यंत आवश्यक असे त्या म्हणाल्या.

एआर इंटरनॅशनल च्या संस्थापक डॉ. अलका मेहता यांनी त्वचारोग क्षेत्रातील AI चा वापर स्पष्ट करताना भारतीय संदर्भातील मजबूत डेटा तयार करण्याची गरज व्यक्त केली. चुकीच्या निदानाचे धोके लक्षात घेता AI चा वापर तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली करावा, असे त्यांनी नमूद केले.

शुगरफिट चे सह-संस्थापक शिवतोष कुमार यांनी लाइफस्टाइल आजारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी डेटा-आधारित कृतीशील उपायांची आवश्यकता अधोरेखित केली. त्यांनी सांगितले की, फक्त डेटा गोळा करून उपयोग नाही, तर त्यावर आधारित योग्य जीवनशैली बदल आवश्यक आहेत. निहिलेंट चे संस्थापक व कार्यकारी अध्यक्ष एल सी सिंग यांनी मानवी भावना, विचारप्रक्रिया आणि तंत्रज्ञान यांच्यातील संबंध स्पष्ट करताना AI ला मानवी भावनांची पूर्ण समज नसल्याचे सांगितले.

## भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यांमुळे नागरिक धास्तावले

### कुत्र्यांना अन्न देण्यामुळे संख्या वाढल्याचा आरोप

पिंपरी (दै. संध्या) : प्राणिप्रेमी नागरिकांकडून पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक भागांत जाऊन भटक्या कुत्र्यांना शिल्लक अन्न व खाद्य टाकले जाते. त्यात टाकाऊ चिकनचे प्रमाण अधिक असते. त्या माध्यमातून विनासायास भूक भागत असल्याने भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे दिसत आहे. एखाद्या दिवशी अन्न मिळण्यास विलंब झाल्यास किंवा न मिळाल्यास ते हिस्त्र होतात. त्यातून नागरिकांवर हल्ला करून त्यांना जखमी करण्याचे प्रकार वाढल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे. प्राणिप्रेमींची भूतदया शहरवासीयांच्या जीवावर बेतत आहे. शहराशेजारील चाकण येथे एका महिलेवर भटक्या कुत्र्यांनी हल्ला करत अक्षरश: लचके तोडले होते. त्यात त्या महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. तसेच, महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्यावरून नगरसेवकांनी प्रशासनावर ताशेरे ओढत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर शंका उपस्थित केली होती. त्यामुळे मोकाट कुत्र्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. शहरातील काही प्राणिप्रेमींकडून भटक्या कुत्र्यांना अन्न दिले जाते. हॉटेल, टपऱ्याकडील शिल्लक अन्नपदार्थ तसेच, शिजवलेला भात, चिकनची हाडे व तुकडे एका डब्यात किंवा बादलीत भरून परिसरात फिरून कुत्र्यांना दिले जाते. काही जण बिस्किट खाऊ घालतात. दुचाकी, कार, टेम्पोतून फिरत ठराविक ठिकाणी आणि ठराविक वेळेला हे अन्न दिले जाते. त्या वेळेला त्या परिसरातील मोकाट 25 ते 30 कुत्री एका ठिकाणी जमा होतात. मिळालेले अन्न खाऊन ती निघून जातात. अशा प्रकारे दिवसातून एक ते दोन वेळा कुत्र्यांना अन्न पुरवले जाते. तसेच, काही रहिवाशी शिल्लक अन्नपदार्थ रस्त्यावर टाकतात. उघड्यावर कचरा टाकण्याचे प्रकारही वाढले आहे. त्यातील अन्नातून भटक्या कुत्र्यांची भूक भागते. परिणामी, कुत्र्यांची संख्या वाढतच आहे. महापालिकेकडून भटक्या कुत्र्यांची नसबंदी केली जात आहे. असे असताना कुत्र्यांची संख्या काही नियंत्रणात येत नसल्याचे दिसत आहे. दिवसेंदिवस शहरात कुत्र्यांची संख्या वाढतच आहे. परिणामी, कुत्र्यांकडून नागरिकांवर विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व महिलांवर हल्ले करण्याचे प्रकार काही कमी होत नसल्याचे निर्देशनास आले आहे. त्यामुळे नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

## रामदास आठवले यांनी सदाफुले परिवाराची घेतली भेट



पुणे (दै. संध्या) : रिपब्लिकन पक्षाचे पुणे शहर सरचिटणीस शाम सदाफुले यांच्या मातोश्री विमल सदाफुले यांचे 18 मार्च रोजी दुःखद निधन झाले. सदाफुले परिवाराची विचार पूस करण्या करिता रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय मंत्री मा. रामदासजी आठवले साहेब यांनी कालवश विमल सदाफुले यांच्या पुण्यानुमोदन दिनाच्या दिवशी सदाफुले परिवारची येरवडा येथील राहत्या घरी सांत्वन पर भेट घेतली. शाम सदाफुले यांच्या वडिलांची आठवले साहेबांनी आस्थेने विचारपूस केली. याप्रसंगी उपमहापौर परशुराम वाडेकर, अध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, सरचिटणीस महिपाल वाघमारे, नगरासेविका हिमाली कांबळे, निलेश आल्हाट, जयदेव रंधवे, सुधीर वाघमोडे, संतोष आरडे व रिपब्लिकन पक्षाचे पदाधिकारी मोठया प्रमाणात उपस्थित होते.


**जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/मोप्र-१, दिनांक १८.१०.२०२३**

**परिशिष्ट-३**

**(ई निविदेसाठी जाहिरात नमुना)**

**महाराष्ट्र शासन,**

**कार्यकारी अभियंता, चासकमान पाटबंधारे विभाग, पुणे यांचे कार्यालय**

पत्ता :- नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, विधानभवन समोर, पुणे ४११००१

ई-मेल eecidpune@gmail.com | दूरध्वनी क्र. :- ०२०-२६१२३१०२

**ई निविदा सूचना क्र. ५० सन २०२५-२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, चासकमान पाटबंधारे विभाग, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, पुणे ४११००१, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाचे संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, चासकमान पाटबंधारे विभाग, पुणे यांचेकडे राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नांव | जिल्हा | निविदेची किंमत रुपये |
|---|---|---|---|
| १ | कोरेगाव धानोरे शाखा कालव्यावरील वितरिका क्र. डावी-१, डावी-३, डावी-४. उजवी-४ व उजवी-५, डिंग्रजवाडी वितरिका, तसेच वितरिका क्र. उजवी-१ वरील उपवितरिका क्र.१.२, ४, ५, ६ व पुच्छ उपवितरिका यांसाठी बंदिस्त नलिका प्रणालीचे बांधकाम करणे, पाणी वापर संस्था स्थापन करणे, पाणी वापर संस्थांना प्रशिक्षण देणे, निवडणूक घेणे व त्याची ५ वर्षांपर्यंत व्यवस्थापन व देखभाल दुरुस्ती करणे व पाणी वापर संस्थेस हस्तांतरण करणे व इतर तदनुषंगीक कामे करणे. | पुणे | रु.५८६१.४१ लक्ष |

ई निविदा उपलब्ध कालावधी: दिनांक ०६/०४/२०२६ ते दिनांक २०/०४/२०२६

ई निविदा उघडण्याचा दिनांक: २२/०४/२०२६ स. ११.०० वा.

जा.क्र. चापावि/लेशा/निविदा/**११९८**/सन २०२६

कार्यकारी अभियंता, चासकमान पाटबंधारे विभाग, पुणे यांचे कार्यालय,

दिनांक :- २७/०३/२०२६

**सही/-**
**(इंजि. मो.ता.जाधवर)**
कार्यकारी अभियंता
चासकमान पाटबंधारे विभाग,
पुणे ४११००१

**क्रमांक : आरओसी-2025-26/क्र-5/C6864**



- **महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६**
  राज्यातील महानगरपालिकांच्या (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता) मंजूर विकास योजनेतील आरक्षित क्षेत्र संबंधित जमिन मालकाने हस्तांतरित केले असल्यास अशा जमिनीवर त्रयस्थ व्यक्तीने / विकासकाने (Third Party / Developer) संबंधित आरक्षणाचे / विकास योजना रस्त्याखालील क्षेत्राचा विकास केल्यास त्याबदल्यात संबंधित विकासकास Construction Amenity TDR देण्याची नवीन तरतुद मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील (UDCPR) विनियम क्र.११.२.५ मध्ये समाविष्ट करण्यासंदर्भात म.प्रा.नि. व न.र. अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१कक) (क) अन्वये सूचना..
- उक्त अधिनियमाचे कलम १५४ (१) खालील निदेश

**सूचना**
**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**४था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : ११.१२.२०२५**

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६*

**क्र. टिपीएस-१८२४/अनौसं-५२/प्र.क्र.१५७/२०२५/नवि-१३:-** ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका, व अन्य काही नियोजन प्राधिकरणे वगळता उर्वरित सर्व नियोजन प्राधिकरणे व प्रादेशिक योजना क्षेत्रांकरीता लागु करावयाच्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस ("यापुढे जिचा उल्लेख "उक्त नियमावली" असा करण्यात आलेला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आलेला आहे) मधील तरतुदींनुसार, शासन अधिसूचना क्र.टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/वि.यो. व प्रायो. कलम ३७ (१कक) (ग) व कलम २० (४)/नवि-१३, दि.०२/१२/२०२० अन्वये मंजुरी दिली आहे;

आणि ज्याअर्थी, आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी, शासनास स्पर्धात्मक निविदा राबवून निवडण्यात आलेल्या खाजगी विकासकामार्फत, मौजा नारी, खसरा क्रमांक १०९-११०/२,३ (भाग) या जागेवर उक्त महानगरपालिकेत कार्यरत सफाई कर्मचाऱ्यांसाठी गृहनिर्माण प्रकल्प राबविण्याकरिता उक्त विकासकास 'हस्तांतरीत विकास हक्क' हे टप्पेनिहाय मोबदला (Stage wise Construction TDR) स्वरूपात व उक्त नियमावलीमधील विनियम क्र.११.२.५ मधील नमूद तरतूदीचे मर्यादित Construction TDR देऊन उक्त प्रकल्प उक्त महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये राबविण्यासाठी मान्यता प्रदान करण्याची विनंती दिनांक १९.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये शासनास केलेली आहे;

आणि ज्याअर्थी, नागपूर महानगरपालिकेच्या उक्त विनंतीस अनुसरुन तसेच संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील प्राप्त अहवालानुसार व सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातून उक्त नियमावलीमधील विनियम क्र.११.२.५ या विनियमामध्ये या सूचनेसोबतच्या "**परिशिष्ट-अ**" मध्ये नमूद केल्याप्रमाणे नवीन तरतुद समाविष्ट करणे आवश्यक आहे असे शासनाचे मत झाले आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त फेरबदल" असा करण्यात आलेला आहे);

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१क क) (क) अन्वये प्राप्त अधिकारात आणि तनुषंगिक शक्तींचा वापर करुन, उक्त फेरबदलावर जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी शासन ही सूचना प्रसिध्द करीत आहे. उक्त फेरबदलावरील कोणत्याही सूचना/हरकती, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत, संबंधित विभागीय सहसंचालक, नगर रचना यांचेकडे दाखल करता येतील. विभागीय सहसंचालक, नगर रचना यांना प्राप्त सूचना/हरकतींवर सुनावणी देऊन आणि आवश्यकतेनुसार संबंधित नियोजन प्राधिकरणांचे म्हणणे घेऊन, त्यावरील अहवाल शासनास सादर करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

ही सूचना, कामकाजाचे दिवशी एक महिन्याच्या कालावधीकरीता जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात उपलब्ध राहील.

१) आयुक्त, सर्व संबंधित महानगरपालिका. (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता)

तसेच, शासन याद्वारे उक्त अधिनियमाचे कलम १५४ (१) अन्वये नव्याने निदेश देत आहे की, उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१कक) चे उपकलम (ग) अन्वये प्रस्तावित फेरबदलास शासनाची अंतिम मान्यता प्रलंबित असेपर्यंत प्रस्तावित फेरबदल व त्यामधील तरतुदी राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता) क्षेत्राकरिता लगोलग अंमलात येतील.

ही **सूचना/निदेश** शासनाचे संकेतस्थळ www.maharashtra.gov.in (कायदे / नियम) वर उपलब्ध राहील.

***महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,***

शिक्का

**सही/-**
**(प्रणव कर्पे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**विमाका/पुणे/जाहि./३९३/२०२५-२६**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### नवकल्पना हाच पुढे जाण्याचा मार्ग - मुंढे

पिंपरी (दैनिक संध्या) : आपण जुन्या विचारांकडे परत जाऊ शकत नाही, नवकल्पना हाच पुढे जाण्याचा एकमेव मार्ग आहे. जिथे भूतकाळ अडथळा नसून त्यापासून शिकवण घेऊन भविष्य घडवण्याची ताकद या नवकल्पनांमध्ये आहे असा विश्वास टाटा टेक्नॉलॉजीसचे प्रकल्प संचालक बालाजी मुंढे यांनी व्यक्त केला. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीइटी) साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) येथे राष्ट्रीय स्तरावरील आयडियाथॉन ३.० आयोजित करण्यात आली होती. यावेळी टाटा मोटर्स जनरल मॅनेजर डॉ. रंगा श्रीनिवास गुंटी, पीसीयू कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे, प्र कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे तसेच डॉ. अनिल महेश्वरी, डॉ. शंकर देवसरकर, डॉ. भारत काळे, डॉ. विजय पाटील, विद्यार्थी, प्राध्यापक आदी उपस्थित होते. या आयडियाथॉन ३.० मध्ये देशातील एकूण ४० संघांनी सहभाग घेतला होता, त्यापैकी ३० संघ महाराष्ट्रातून तर १० संघ इतर राज्यांतून होते. कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी सांगितले की, नवकल्पना ही केवळ एक कृती नाही, तर प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये विकसित होणारी विचारसरणी आहे. आयडियाथॉन सारखे उपक्रम विद्यार्थ्यांना नोकरी शोधणाऱ्यांना निर्माते बनवतात. त्यांच्या या विचारांतून पीसीयू चा नवकल्पना आणि उद्योजकता विकसित करण्याचा दृढ संकल्प दिसून आला. सहभागी संघांनी प्रचंड ऊर्जा, जिद्द आणि नाविन्यपूर्ण कल्पना सादर केल्या. स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे :- प्रथम क्रमांक - व्हिआयटी पुणे (५० हजार रुपये), द्वितीय क्रमांक - पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) (३० हजार रुपये रोख) आणि तृतीय क्रमांक - डी.जे. संघवी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग (२० हजार रुपये) विजेत्या संघांना प्रशस्तीपत्र, पारितोषिक आणि रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. पीसीइटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी विजेत्या संघाचे आणि मार्गदर्शकांचे अभिनंदन केले.



### ॲड. विजयकुमार रामचंदानी यांना पीएचडी प्रदान

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी कॅम्प मधील रहिवाशी ॲड. विजयकुमार रामचंदानी यांना राजस्थान, झुंझुनू येथील श्री जगदीश प्रसाद झाबरमल टिबरेवाला विद्यापीठाने पीएचडी ही पदवी प्रदान केली आहे. त्यांनी अर्थशास्त्र या विषयात "अ स्टडी ऑफ इकॉनॉमिक्स ग्रोथ ट्रेंड्स अँड डेव्हलपमेंट ऑफ द रियल इस्टेट सेक्टर ड्युरिंग २०१३ ते २०२३ विथ रेफरन्स टू पुणे सिटी" या विषयावर प्रबंध सादर केला होता. त्यास मान्यता देण्यात आली आणि २३ मार्च २०२६ रोजी ॲड. विजयकुमार रामचंदानी यांना पीएचडी प्रदान करण्यात आली.

### पिंपरी चिंचवड शहरामध्ये होणार प्रथमच महिलांसाठी 'टी-20 क्रिकेट' स्पर्धा

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशनतर्फे यावर्षी पुरुष व महिला खुली टी-२० प्रीमियर लीग दि.०६ एप्रिल २०२६ पासून फोरस्टार क्रिकेट मैदान फेज-३,माण येथे आयोजित करण्यात येणार असून सदर स्पर्धा उदयोन्मुख महिला व पुरुष खेळाडूंसाठी मोठी पर्वणी ठरणार आहे. ही स्पर्धा पांढऱ्या चेंडूवर होणार आहे. महिलांचे सामने २२ एप्रिल २०२६ पासून सुरू होतील तर पुरुषांचे सामने दिनांक ६ एप्रिल पासून सुरू होतील. दि.२७ मार्च २०२६, शुक्रवार रोजी रामकृष्ण बँक्वेट हॉल, हॉटेल रामकृष्ण, रावेत येथे संसदरत्न खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या हस्ते टी-२० स्पर्धा करंडकाचे व संघांच्या टी-शर्टचे अनावरण झाले. यावेळी बोलताना खासदार श्रीरंग आप्पा बारणे म्हणाले की, पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशनच्या स्पर्धा नवीन उदयोन्मुख खेळाडूंना एक मोठी संधी निर्माण करतात, याचा फायदा सर्व खेळाडूंनी घ्यावा.या स्पर्धांद्वारे खेळाडूंना प्रोत्साहन मिळते व ते आपल्या खेळाचा दर्जा उंचवू शकतात. यावेळी पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष जगदीश शेट्टी यांनी स्पर्धेची पूर्ण माहिती दिली. या स्पर्धेत, महिलांच्या स्पर्धेतील विजेत्या प्रथम संघास ७५०००/- रुपये रोख व करंडक, द्वितीय संघास ५००००/- रुपये रोख व करंडक, तृतीय संघास २५०००/- रुपये रोख व करंडक तसेच उत्कृष्ट फलंदाज रुपये ५०००/- रोख व करंडक, उत्कृष्ट गोलंदाज रुपये ५०००/- रोख व करंडक, उत्कृष्ट अष्टपैलू रुपये ७०००/- व करंडक तसेच उत्कृष्ट क्षेत्ररक्षक रुपये ५०००/- व करंडक याशिवाय प्रत्येक सामन्यास प्लेयर ऑफ द मॅच व फाइटर ऑफ द मॅच ही वैयक्तिक पारितोषक देऊन सन्मानित करण्यात येईल. पुरुषच्या स्पर्धतील प्रथम पारितोषिक विजेत्या संघास १५००००/- रुपये रोख व करंडक, द्वितीय संघास १०००००/- रुपये रोख व करंडक तसेच तृतीय संघास ७५०००/- रुपये रोख व करंडक तसेच उत्कृष्ट फलंदाज रुपये १००००/- रोख व करंडक, उत्कृष्ट गोलंदाज रुपये १००००/- रोख व करंडक, उत्कृष्ट अष्टपैलू रुपये ११०००/- व करंडक तसेच उत्कृष्ट क्षेत्ररक्षक रुपये १००००/- व करंडक याशिवाय प्रत्येक सामन्यास प्लेयर ऑफ द मॅच व फाइटर ऑफ द मॅच ही वैयक्तिक पारितोषके देण्यात येतील.

# शहरात साहित्य, इतिहास व सामाजिक कार्याचा संगम

## संभाजी बारणे यांच्या कार्याचे महापौरांकडून कौतुक; थेरगावचा इतिहास ते शिवचरित्र संकलन; बारणे यांची उल्लेखनीय वाटचाल

पिंपरी (दै. संध्या) :

थेरगाव परिसरातील सामाजिक कार्यकर्ते, कवी व लेखक संभाजी बाळासाहेब बारणे यांनी नुकतीच पिंपरी-चिंचवड शहराचे महापौर रवी लांडगे यांची भेट घेत शहराच्या वैभवावर आधारित आपल्या कवितासंग्रहाचे पुस्तक त्यांना भेट दिले. शहराच्या संस्कृती, विकास आणि ओळख यांचे प्रभावी चित्रण करणाऱ्या या कवितासंग्रहाचे महापौरांनी मनापासून कौतुक केले.

यावेळी संभाजी बारणे यांनी सध्या सुरू असलेल्या त्यांच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची माहिती देताना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित ५५१ शिवचरित्रांचे संकलन पूर्ण केल्याचे सांगितले. त्यांच्या या अभ्यासपूर्ण आणि प्रेरणादायी कार्याची दखल घेत महापौर रवी लांडगे यांनी बारणे यांच्या जिद्द, अभ्यासू वृत्ती आणि सांस्कृतिक बांधिलकीचे विशेष अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

संभाजी बारणे हे केवळ कवी नसून एक संशोधक वृत्तीचे लेखक म्हणूनही ओळखले जातात. त्यांनी 'थेरगावचा इतिहास' हे महत्त्वपूर्ण पुस्तक लिहून स्थानिक इतिहासाला उजाळा दिला आहे. याशिवाय विविध वस्तूंचे संकलन हा त्यांचा विशेष छंद असून पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील लोकप्रतिनिधींच्या व्हिजिटिंग कार्डचे केलेले संकलन 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये नोंदले गेले आहे. आता शिवचरित्र संकलनालाही अशीच मान्यता मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांचीही बारणे यांनी भेट घेतली.

त्यांना कवितासंग्रह व 'थेरगावचा इतिहास' या पुस्तकांच्या प्रती भेट देण्यात आल्या. या पुस्तकातील ऐतिहासिक संदर्भांमध्ये शितोळे कुटुंबाच्या योगदानाचा उल्लेख असल्याची माहिती बारणे यांनी दिली.

या पार्श्वभूमीवर प्रशांत शितोळे यांनीही बारणे यांच्या संशोधनपर कार्याचे कौतुक केले.

'थेरगावचा इतिहास' या पुस्तकात बडोदा संस्थानचे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या कारकिर्दीत शितोळे यांच्याकडे कारभाराची जबाबदारी सोपविण्यात आली होती, तसेच थेरगाव, पिंपळे सौदागर परिसरातील शेतसारा व्यवस्थापनात स्थानिक कुटुंबांची भूमिका अधोरेखित करण्यात आली आहे. या ऐतिहासिक नोंदींमुळे स्थानिक वारसा आणि सामाजिक रचनेचे महत्त्व अधोरेखित होते.

सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, कला आणि पर्यावरण अशा विविध क्षेत्रात सक्रिय असलेले संभाजी बाळासाहेब बारणे यांचे कार्य पिंपरी-चिंचवड शहरासाठी अभिमानास्पद असल्याचे महापौर रवी लांडगे व पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी नमूद केले.

आगामी काळात शिवचरित्र संकलनाच्या माध्यमातून इतिहासाची जपणूक आणि प्रेरणादायी वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचे बारणे यांचे ध्येय असल्याचेही त्यांनी सांगितले.



## पिंपळे सौदागरमध्ये स्वतंत्र पोलीस स्टेशन सुरू करा: नगरसेविका कुंदा भिसे यांची मागणी

पिंपरी (दै. संध्या) :

पिंपळे सौदागर परिसरातील झपाट्याने वाढणारी लोकसंख्या, वाढती नागरी वसाहत आणि त्यानुसार वाढणाऱ्या सुरक्षाविषयक गरजा लक्षात घेता, या भागात स्वतंत्र पोलीस स्टेशन सुरू करण्याची मागणी आता अधिक तीव्र झाली आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेविका कुंदा संजय भिसे यांनी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांची भेट घेऊन यासंदर्भात निवेदन सादर केले आहे.

सध्या पिंपळे सौदागर परिसरातील नागरिकांना कोणत्याही पोलीस संबंधित कामासाठी सांगवी पोलीस स्टेशनवर अवलंबून राहावे लागते. दोन्ही ठिकाणांमधील अंतर, वाढती वाहतूक कोंडी, तसेच मोठ्या प्रमाणात वाढलेली लोकसंख्या यामुळे नागरिकांना तक्रार नोंदविणे, कागदपत्रांची पूर्तता करणे किंवा इतर सेवांसाठी मोठा वेळ व श्रम खर्च करावा लागत आहे.

विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि आपत्कालीन परिस्थितीत त्वरित पोलीस सेवा मिळण्यात अडथळे निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

या निवेदनात कुंदा भिसे यांनी म्हटले आहे की, "पिंपळे सौदागर हा वेगाने विकसित होणारा परिसर असून नागरिकांच्या सुरक्षेसाठी व सोयीसाठी स्वतंत्र पोलीस स्टेशन अत्यंत आवश्यक आहे.

नागरिकांना लांब अंतर पार करून सांगवी पोलीस स्टेशनला जावे लागणे ही गंभीर बाब आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवरच पोलीस सेवा उपलब्ध करून देण्यासाठी हा पाठपुरावा सुरू आहे."

या पार्श्वभूमीवर पिंपळे सौदागर परिसरात स्वतंत्र पोलीस स्टेशन सुरू करणे ही अत्यंत गरजेची बाब असल्याचे भिसे यांनी स्पष्ट केले. यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मालकीची योग्य जागा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे, ज्यामुळे नागरिकांना त्यांच्या परिसरातच तात्काळ व सुलभ पोलीस सेवा मिळू शकेल आणि कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षमपणे राखता येईल.

याबाबत पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी सकारात्मक भूमिका दर्शवून या मागणीची गांभीर्याने दखल घेतली असून, लवकरच योग्य तो निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन दिले.



## महापालिकेत ६ हजार २५७ कोटींचा गैरव्यवहार? ८ दिवसांत कारवाई करण्याची मारूती भापकरांची मागणी

पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या लेखापरीक्षणातून तब्बल ६ हजार २५७ कोटी रुपयांच्या गैरव्यवहार व गैरकारभाराचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी केला आहे. याबाबत जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर आठ दिवसांत कठोर कारवाई करावी, अशी मागणी मारुती भापकर यांनी केली आहे.

भापकर यांनी महापौर, आयुक्त, स्थायी समिती सभापती, सत्तारूढ पक्षनेते, विरोधी पक्षनेते यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे.

या निवेदनात त्यांनी नमूद केले आहे की, महापालिकेच्या अंतर्गत व विशेष लेखापरीक्षणात प्रचंड आर्थिक अनियमितता आढळून आली असून त्यावर अद्याप ठोस कारवाई झालेली नाही.

मुख्य लेखापरीक्षकांनी दिलेल्या माहितीनुसार, सन १९८२-८३ ते मार्च २०२६ या कालावधीत प्रलंबित आक्षेप, वसूलपात्र रक्कम आणि तपासणीअभावी आक्षेपाधीन रक्कम मिळून सुमारे ६ हजार २३४ कोटी रुपयांची रक्कम वादग्रस्त आहे. तसेच उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार झालेल्या विशेष लेखापरीक्षणात आणखी २२ कोटी रुपयांचा मुद्दा समोर आला आहे. अशा प्रकारे एकूण ६ हजार २५७ कोटी १ लाख ५८ हजार ८५ रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

मारूती भापकर यांनी म्हटले आहे की, लेखापरीक्षण विभागावर दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च होतो, मात्र आढळलेल्या अनियमिततेवर वेळेत कारवाई होत नाही. त्यामुळे प्रशासनाने दोन महिन्यांच्या आत ठोस पावले उचलावीत, अन्यथा पुन्हा मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. या प्रकरणामुळे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून प्रशासन आता काय भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## हमीपत्र दिलेल्या विकसकांनी फ्लॅटधारकांना पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी पार न पाडल्यास कठोर कारवाई करणार — आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी

पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत ज्या विकसकांनी फ्लॅटधारकांना ताबा देण्यापूर्वी पाणीपुरवठ्याची जबाबदारी स्वीकारत लेखी हमीपत्र दिले आहे, त्यांनी ती जबाबदारी काटेकोरपणे पार पाडणे बंधनकारक आहे. संबंधित जबाबदारीकडे दुर्लक्ष केल्यास किंवा पाणीपुरवठ्याचा अन्यायकारक आर्थिक भार सोसायट्यांवर टाकल्यास महानगरपालिका संबंधितांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करेल, असा स्पष्ट इशारा पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिला. मुंबई उच्च न्यायालयातील १० एप्रिल २०२३ रोजीच्या जनहित याचिकेच्या अनुषंगाने पाणीपुरवठ्याबाबत स्थापन करण्यात आलेल्या समितीची बैठक नुकतीच पार पडली. यावेळी ते बोलत होते.

पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीस पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता महेश बरिदे यांच्यासह पुणे महापालिका तसेच पीएमआरडीएचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.




बैठकीदरम्यान पिंपरी चिंचवड व पुणे महानगरपालिका क्षेत्रातील विविध गृहनिर्माण सोसायट्यांना भेडसावणाऱ्या पाणीटंचाईच्या समस्यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. भामा-आसखेड, आंद्रा पाणीपुरवठा योजनेसह काही महत्त्वाच्या जलपुरवठा प्रकल्पांची कामे अद्याप अपूर्ण असल्यामुळे सर्व क्षेत्रांना १०० टक्के पाणीपुरवठा करणे सध्या शक्य नसल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

यावेळी विभागीय आयुक्त डॉ.पुलकुंडवार म्हणाले की,फ्लॅट ताबा देण्यापूर्वी विकसकांकडून स्वतःच्या खर्चाने पाणीपुरवठा करण्याबाबत घेतलेल्या लेखी हमीपत्रांचे काटेकोर पालन व्हावे. ज्या ठिकाणी विकसक ही जबाबदारी टाळतात किंवा खर्च सोसायट्यांवर टाकतात, त्या प्रकरणांत संबंधित महानगरपालिकांनी कायदेशीर कारवाई करावी.

तसेच सर्व मंजूर नाहरकत प्रमाणपत्रे (NOC) व विकसकांनी सादर केलेली हमीपत्रे महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे, नागरिकांना त्यांच्या सोसायटीचा संबंधित योजनेत समावेश आहे की नाही, याची माहिती पारदर्शकपणे उपलब्ध करण्याबाबत देखील बैठकीत चर्चा झाली.

# शहराचा गौरव वाढविणाऱ्या ज्येष्ठांसह लहान मुलांचा महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते सन्मान

पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी चिंचवड शहरातील ज्येष्ठांचा अनुभव, त्यांची जिद्द आणि समाजाशी असलेली नाळ ही आपल्या शहराची मौल्यवान ताकद आहे; तर लहान मुलांचा उत्साह, गुणवत्ता आणि नवे विक्रम घडविण्याची क्षमता हे शहराच्या उज्वल भविष्याचे आश्वासन आहे. एका बाजूला आयुष्यभर शिस्त, सातत्य आणि चिकाटी जपणारे ज्येष्ठ, तर दुसऱ्या बाजूला क्रीडा, बुद्धिमत्ता आणि कौशल्याच्या जोरावर मोठी स्वप्ने साकार करणारी आपली मुले, हा पिंपरी चिंचवडचा सर्वात प्रेरणादायी चेहरा आहे. अशा व्यक्तींचा सन्मान म्हणजे केवळ त्यांच्या यशाचा गौरव नसून, संपूर्ण समाजाला प्रेरणा देणारा आणि नव्या पिढीला दिशा देणारा संदेश आहे. आपल्या शहरातील प्रत्येक गुणवंताला प्रोत्साहन देण्यासाठी महानगरपालिका नेहमीच कटिबद्ध राहील, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.

नुकत्याच झालेल्या पुणे सायकल ग्रँड टूर स्पर्धेच्या निमित्ताने चर्चेत असलेले भोसरी येथील ८४ वर्षाचे प्रसिद्ध सायकलपटू अशोक विष्णुपंत बेलापूरकर तसेच लॉन टेनिस राज्यस्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविणारा मनपा शाळेतील विद्यार्थी राम मुगदुस, गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये २ मिनिटे ४ सेकंदात १९५ देशांचे झेंडे ओळखण्याचा विक्रम नोंदविणाऱ्या ५ वर्षीय तेजस जोशी यांचा सन्मान महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते महापालिकेच्या दिवंगत माजी महापौर मधुकर पवळे सभागृहात पार पडला, त्यावेळी ते बोलत होते.

या सत्कार सोहळ्यास उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे,सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर तसेच क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे यांच्यासह उपायुक्त पंकज पाटील, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आदी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड शहराचे शिल्पकार माजी नगराध्यक्ष अण्णासाहेब मगर यांनी ३५ वर्षापूर्वी बेलापूरकर यांची सायकलची आवड पाहून त्यांना सायकल भेट दिली होती. तीच सायकल ते आत्तापर्यंत वापरत होते सायकलवरून गेल्या ७० वर्षात लाखो किलोमीटरचा प्रवास त्यांनी केला आहे.

वारकरी असलेल्या बेलापूरकर यांनी सायकलवरून आळंदी ते पंढरपूर अशी अनेक वर्ष वारी केली आहे तसेच विविध राज्यांचा प्रवास देखील त्यांनी सायकलवर केला आहे, याशिवाय ते "सायकल चालवा -पर्यावरण वाचवा" आणि "झाडे लावा - झाडे जगवा" अशा सामाजिक कार्याचाही प्रचार करतात अशी माहिती महापौर रवि लांडगे यांनी दिली.



महापौर रवि लांडगे यांनी दिलेली सायकल यापुढील आयुष्यात वापरणार आहे, अशा भावना बेलापूरकर यांनी सत्कारास उत्तर देताना व्यक्त केल्या.

लॉन टेनिस राज्यस्तरीय स्पर्धेत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रावेत येथील माध्यमिक विद्यालय केशवनगर शाळेचा इ. १० वीचा विद्यार्थी राम विक्रम मुगदुस याने प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे.

दिल्ली येथे होणाऱ्या १७ वर्षाखालील लॉन टेनिस च्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत देखील तो सहभागी होणार आहे.

तर पिंपरी चिंचवड शहरातील रावेत येथील अवघ्या ५ वर्ष २ महिन्याचा तेजस जोशी याने इंडीया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये २ मिनिटे ४ सेकंदात १९५ देशांचे झेंडे ओळखण्याचा विक्रम नोंदवून शहराच्या नावलौकिकात भर पाडली आहे यासाठी त्यांचे आई वडील रेखा व नीलम जोशी यांनी त्याला मार्गदर्शन केले आहे.

सामाजिक कार्यकर्ते भरत खंडू आडसूळ यांना गुणवंत कामगार पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलेले आहे.

त्यांनी दुर्घटनाग्रस्त आणि कोरोना काळातील मयत झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना सामाजिक बांधिलकीतून आर्थिक मदत केली आहे.

या सर्वांचा महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते आणि मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## शिरूर नगरपरिषदेची अभय योजनेतून 75 लाखांची वसुली

शिरूर (दैनिक संध्या) : शिरूर नगरपरिषदेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या अभय योजना अंतर्गत आतापर्यंत सुमारे ७५ लाख रुपयांची कर वसुली करण्यात आली असून, नागरिकांकडून या योजनेला संमिश्र प्रतिसाद मिळत असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राबविण्यात आलेल्या या योजनेमुळे थकीत मालमत्ता करावरील दंड मोठ्या प्रमाणावर माफ करण्यात येत असल्याने अनेक नागरिकांनी कर भरण्यास पुढाकार घेतला आहे. तथापि, योजनेच्या अपेक्षित तुलनेत अजूनही प्रतिसाद वाढविण्याची गरज असल्याचे स्पष्ट होत आहे. नगरपरिषदेच्या कर विभागाकडून शहरात जनजागृती मोहीम राबविण्यात येत असून, थकबाकीदारांना नोटीस, प्रत्यक्ष भेटी व आवाहनाच्या माध्यमातून कर भरण्यास प्रोत्साहित केले जात आहे. आर्थिक वर्ष समाप्तीच्या पार्श्वभूमीवर वसुली वाढविण्यासाठी प्रशासनाकडून विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. याबाबत मुख्याधिकारी प्रीतम पाटील यांनी सांगितले की, अभय योजनेचा लाभ घेऊन नागरिकांनी थकीत कर तात्काळ भरावा. दंडमाफीचा लाभ मर्यादित कालावधीसाठी उपलब्ध असून, त्यानंतर कठोर वसुली कारवाई करण्यात येईल. शहराच्या विकासासाठी कर भरणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. यासोबतच कर निरीक्षक श्री. माधव गाजरे यांनीही नागरिकांना आवाहन करताना नमूद केले की, "अभय योजनेच्या तुलनेत अपेक्षित प्रतिसाद अजूनही मिळणे आवश्यक आहे. नागरिकांनी शेवटच्या क्षणाची वाट न पाहता त्वरित कर भरून शासनाने दिलेल्या सवलतीचा लाभ घ्यावा." शासनाने दिलेल्या या सवलतीचा लाभ घेऊन तात्काळ कर भरावा आणि पुढील दंडात्मक कारवाई टाळावी. नगरपरिषद प्रशासनाने सर्व नागरिकांना असे आवाहन केले आहे.

## तांब्याचे हांडे चोरणाऱ्या महिलांच्या टोळीला अटक : चोरलेले 55 तांब्याचे हांडे जप्त

जुन्नर (दैनिक संध्या) : जुन्नर येथील भांड्याचे व्यावसायिकाचे गोडाऊन मधून नव्वद तांब्याचे हांडे चोरणाऱ्या महिलांच्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. त्यांनी चोरलेल्या ९० हांड्यापैकी सुमारे एक लाख ३७ हजार ५०० रुपये किमतीचे ५५ हांडे त्यांच्या ताब्यातून जप्त करण्यात आले आहेत. चोरीची ही घटना २० मार्च रोजी रात्रीच्या वेळी घडली होती.याबाबत जुन्नर पोलीस स्टेशनला व्यावसायिक आनंद हेमंत सासवडे यांनी फिर्याद दिली होती. महाजन आळी-जुन्नर येथील त्यांच्या भांड्याच्या गोडाऊन मधून तीन महिलांनी ही चोरी केल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसून येत होते. ह्या गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखेमार्फत समांतर तपास करत असताना परिसरातील सीसीटीव्ही फुटेज ची पाहणी केली असता भांड्याच्या गोडाऊन मधून काही अज्ञात महिला हांडे चोरून नेत असताना दिसून आले. यावरून सदरचा गुन्हा अज्ञात महिलांनी केल्याचे निष्पन्न झाले. गुन्हे शाखेचे सहाय्यक फौजदार दिपक साबळे व पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार सदरचा गुन्हा सारिका बबन मकवाने, अंजली सुरज वाघमारे ,सुरेखा राजू वालेकर सर्व रा. पंचलिंग झोपडपट्टी वस्ती जुन्नर यांनी केल्याचे निष्पन्न झाले. गुन्हे शाखेच्या पथकाने मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार कुरण फाटा, जुन्नर येथे सापळा लावून सदर महिलांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे विचारपूस केली असता त्यांनी गुन्हा कबूल केला.



## पुरंदर तालुक्यातील कोथळे येथे चाळीसावा हरिनाम सप्ताह संपन्न

जेजुरी (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्यातील कोथळे येथे श्री तात्याबा सेवा मंडळ व ग्रामस्थांच्या वतीने प्रवचन, कीर्तन, हरिनाम, ग्रंथपुजन महाप्रसाद, आदी धार्मिक उपक्रम राबवून चाळीसवा हरिनाम सप्ताह व गाथा पारायण सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यात हभप सुजय जगताप, देविदास यादव, पोपट भोसले, स्नेहा जगताप, आसाराम तुपे, कावेरी काळे. हभप ज्ञानेश्वर भोईटे गुरुजी यांचे प्रवचन तर हभप सृष्टी महाराज जगताप, ऋषिकेश नवले, शिवचैत्यांन मोरे, सुनील शिंदे, जयश्री येवले, बाळकृष्ण गोगावले, गणेश राऊत, बाजीराव महाराज बांगर यांची कीर्तन सेवा आणि हभप केशव महाराज मुळीक यांचे काल्याचे कीर्तन झाले. या सोहळ्यात कै हिराबाई भोईटे यांच्या स्मरणार्थ ज्ञानेश्वरीचे वाटप, विठ्ठल नाझरकर यांच्या वतीने महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले. या सोहळ्याचे नियोजन रवींद्र जगताप, शांताराम जगताप, रामचंद्र जगताप, श्रीकांत जगताप, सोपान काकडे, अभिजित जगताप, प्रकाश जगताप, ज्ञानेश्वर भोईटे गुरुजी व ग्रामस्थांनी केले. या सोहळ्याचे सूत्रसंचालन दत्तात्रय आबा भोईटे यांनी केले.

## बारामती बाजारात लसूण, गवारी आणि राजमाला चांगले दर

बारामती (दैनिक संध्या) : बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जळोची उपबाजारात शनिवारी भाजीपाल्याची आवक समाधानकारक राहिली. काही प्रमुख पिकांना चांगले दर मिळाल्याचे चित्र दिसून आले. विशेषतः लसूण, गवार, राजमा यांसारख्या पिकांचे दर चांगले निघाले, तर काही पालेभाज्यांचे दर स्थिर राहिले. मार्चअखेरमुळे बारामती बाजार समितीच्या मुख्य यार्डातील भुसार धान्यांचे लिलाव गुरुवारी बंद राहिले होते. जळोची उपबाजारात फळे व भाजीपाल्याचे लिलाव होतात. शुक्रवारी येथील मार्केट बंद असते. शनिवारी मात्र जळोची उपबाजारात विविध प्रकारच्या पालेभाज्या आणि फळांची मोठी आवक झाली. गावरान गवारीची समितीत 12 क्विंटल आवक झाली. किमान चार हजार ते कमाल दहा हजार आणि सरासरी आठ हजार रुपये क्विंटल दर मिळाला. उपबाजारात गवारीला 80 रुपये प्रतिकिलो दर मिळत असला तरी प्रत्यक्षात किरकोळ विक्रीत 120 रुपयांच्या पुढेच गवारीचे दर आहेत. पुणेरी गवारीची 15 क्विंटल आवक झाली. तिला अडीच हजार ते पाच हजार व सरासरी चार हजार रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. आठ क्विंटल राजमा समितीत आला होता. त्याला किमान दीड हजार ते कमाल साडेचार हजार व सरासरी चार हजार दर मिळाला. बाजारात लसणाची सर्वाधिक आवक नोंदली गेली. सुमारे 100 क्विंटल आवक झालेल्या लसणाला किमान 4000 रुपये, कमाल 12000 रुपये, तर सरासरी 8000 रुपये दर मिळाला. हिरवी मिरची, टोमॅटो, वांगी आणि काकडी यांसारख्या भाजीपाल्यांची आवक मध्यम राहिली.

# धालेवाडी येथे सावित्रीज्योती महिला प्रभाग संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**जेजुरी (दै. संध्या)**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत बेलसर माळशिरस जिल्हा परिषद गटातील सावित्रीज्योती महिला प्रभाग संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा धालेवाडी येथे पार पडली.

येथील शिवशंभो मंगल कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमास पुरंदर पंचायत समितीचे उपसभापती प्रवीण जगताप, सदस्य माणिक निंबाळकर व माऊली यादव, गावच्या सरपंच लक्ष्मी कदम तालुका अभियान व्यवस्थापक नंदा कुर्डे प्रमुख उपस्थित होते. दिपप्रज्वलन करून व सरस्वती, छत्रपती शिवराय, सावित्रीबाई फुले व झाशीची राणी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

उपसभापती प्रवीण जगताप यांनी मनोगतात बचत गटाच्या महिलांनी निधीचा योग्य वापर करावा, व्यवहारात पारदर्शकता असावी असे आवाहन करत पंचायत समिती तुमच्या सर्व उपक्रमांसाठी कायम स्वरुपी मदत करेल असे सांगितले. माणिक निंबाळकर व माऊली यादव यांनीही आपले विचार व्यक्त केले.

तालुका व्यवस्थापक गणेश किकले तसेच आर सी टी चे संजय मांढरे , ग्रामस्थ हनुमंत काळाने यांनी या प्रसंगी महिलांना मार्गदर्शन केले.

प्रभाग संघाच्या अध्यक्षा सीमा काळाणे यांनी प्रास्ताविक केले तर सुप्रिया भोसले यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व अश्विनी क्षीरसागर यांनी आभार



मानले. याच कार्यक्रमात राजुरी येथील काळभैरवनाथ ग्रामसंघास समुदाय गुंतवणूक निधी अंतर्गत १८ लाख ६० हजार रुपयांच्या धनादेशाचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले

सोनाली कामथे यांनी सादर केलेले हुंडा विरोधी गीत सीमा साळवे व अश्विनी चौंडकर यांनी गायन केलेल्या सावित्रींच्या ओव्या, अनिता दीक्षित यांनी रेखाटलेली सुंदर रांगोळी, पूर्वा जगताप या छोट्या मुलीने खड्या आवाजात

बोललेली शिवगर्जना, सर्व ग्रामसंघ व ग्रामसखी यांचा झालेला सन्मान, सविता इंगळे, मनिषा कामथे, रेश्मा होले

रुपाली गुरव यांनी मांडलेल्या स्वतःच्या यशोगाथा तसेच प्राची गद्रे यांनी हस्तकलेतून बनवलेली उमेद ची प्रतिमा या बाबी कार्यक्रमाच्या उंची वाढवणाऱ्या ठरल्या.

तालुका व्यवस्थापक गणेश किकले, सागर ढाकणे, सुमित फडतरे, महंतवीर घाडगे, रमेश भंडलकर , महंमद शेतसंदी, प्रभाग संघाच्या अध्यक्षा सीमा काळाणे, सचिव ज्योती आबनावे, कोशाध्यक्ष अश्विनी कटके, सीमा साळवे मोहिनी देवकर आदींनी या कार्यक्रमाचे उत्तम संयोजन केले. उपसरपंच अंकिता काळाणे, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख विठ्ठल गुरव, नितीन इंगळे यांसह मोठ्या संख्येने महिला उपस्थित होते.

## संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे ८ जुलैला प्रस्थान, २४ जुलैला पंढरपूर आगमन

**आळंदी (दै. संध्या)**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांचा आषाढी वारी पालखी सोहळा यंदा ८ जुलै रोजी दुपारी तीन वाजता आळंदीहून पंढरपूरकडे प्रस्थान करणार असून २४ जुलै रोजी पंढरपूर येथे आगमन होणार आहे. आषाढी एकादशी २५ जुलै रोजी साजरी होणार असल्याची माहिती पालखी सोहळाप्रमुख ॲड. राजेंद्र उमाप यांनी दिली. या वर्षी १७ दिवसांच्या वारीत ४ गोल व ३ उभे रिंगण होणार आहेत.

यासंदर्भात संत ज्ञानेश्वर महाराज मठात आळंदी संस्थानची बैठक पार पडली. बैठकीला संस्थानचे प्रमुख विश्वस्त भावार्थ देखणे, विश्वस्त योगी निरंजननाथ,



चैतन्य महाराज कबीर, ॲड.रोहीणी पवार, पालखीसोहळा मालक राजाभाऊ आरफळकर, दिंडी समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते. चैत्र दशमीपासून वारीच्या नियोजनाची परंपरा असून त्यानुसार प्रस्थान, मुक्काम व अन्य बाबींचा आढावा घेण्यात आला.

कार्यक्रमानुसार ८ जुलै रोजी आळंदीहून प्रस्थान झाल्यानंतर ९ व १० जुलै पुणे, ११ व १२ जुलै सासवड, १३ जुलै जेजुरी, १४ जुलै वाल्हे, १५ जुलै नीरा स्नानानंतर लोणंद, १६ जुलै चांदोबाचा लिंब येथे पहिले उभे रिंगण होऊन तरडगाव येथे मुक्काम असेल. १७ जुलै फलटण, १८ जुलै बरड, १९ जुलै नातेपुते, २० जुलै पुरंदवडे येथे पहिले गोल रिंगण होऊन माळशिरस, २१ जुलै खडूस फाटा येथे दुसरे गोल रिंगण होऊन वेळापूर, २२ जुलै ठाकुरबुवा समाधीजवळ तिसरे गोल रिंगण व टप्पा येथे बंधू भेट होऊन भंडीशेगाव येथे मुक्काम असेल. दि.२३ जुलै रोजी बाजीराव विहीर येथे गोल व उभे रिंगण होऊन वाखरी येथे पालखी विसावणार आहे. २४ जुलै रोजी आषाढ दशमीला पंढरपूर येथे सर्व संतांच्या पालख्या दाखल होणार आहेत.

ऊन, वारा, पाऊस याची पर्वा न करता शेकडो मैल पायी चालत विठुरायाच्या दर्शनासाठी वारकरी आतुर असतात. यंदाही वारीची ओढ भाविकांमध्ये वाढली असून प्रशासनाकडे विविध सोयी-सुविधांबाबत मागण्या मांडण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

## तहसील कार्यालयात दारूच्या नशेत गोंधळ; कर्मचाऱ्याला जिवे मारण्याची धमकी

**घोडेगाव (दै. संध्या)**

आंबेगाव तालुका तहसील कार्यालय, घोडेगाव येथील अभिलेख कक्षामध्ये शासकीय कर्मचाऱ्यांना जिवे मारण्याची धमकी देत सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी सुनील वसंत लोले (वय ३८) यांच्याविरोधात घोडेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महसूल सहायक सचिन ओहळ यांनी याबाबत तक्रार दिल्याची माहिती सहायक पोलिस निरीक्षक सागर पवार यांनी दिली.

दि. २५ रोजी दुपारच्या सुमारास आंबेगाव तहसील कार्यालयातील अभिलेख कक्षामध्ये लोले हे दारूच्या नशेत येऊन ७/१२ उतारा व फेरफार तत्काळ देण्याची मागणी करत मोठमोठ्याने आरडाओरडा करत होते. यावेळी त्यांनी महसूल सहायक सचिन ओहळ तसेच इतर कर्मचाऱ्यांना शिवीगाळ व दमदाटी केली.

ओहळ यांना जिवे मारण्याची धमकी देत अभिलेख कक्षातील टेबलवरील कागदपत्रे अस्ताव्यस्त फेकून देत सरकारी कामकाजात अडथळा निर्माण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. सचिन ओहळ यांनी घोडेगाव पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार लोले यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहायक फौजदार हरिभाऊ नलावडे करीत आहेत.



## माळेगाव तंत्रनिकेतनचे महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या समितीकडून शैक्षणिक परीक्षण संपन्न

**माळेगाव (दै. संध्या)**

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबईच्या वतीने माळेगाव येथील माळेगाव तंत्रनिकेतनचे वार्षिक 'बाह्य शैक्षणिक संनियंत्रण' दिनांक २८ मार्च रोजी उत्साहात पार पडले. मंडळाने नियुक्त केलेल्या उच्चस्तरीय बाह्य समितीने या महाविद्यालयातील शैक्षणिक दर्जा, सोयीसुविधा आणि प्रशासकीय कामकाजाची सखोल पाहणी केली. या समितीमध्ये प्रा. अयुब तांबोळी, प्रा. ज्ञानेश्वर खोपडे, प्रा. विजय कुकरे, प्रा. रमेश बोलाडे यांचा समावेश होता.

समितीने व्यक्त केले समाधान

समितीच्या सदस्यांनी महाविद्यालयातील शिस्त, अद्ययावत प्रयोगशाळा आणि विद्यार्थ्यांच्या तांत्रिक कौशल्यांबाबत समाधान व्यक्त केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार तांत्रिक शिक्षण देण्यासाठी संस्था करत असलेल्या प्रयत्नांचे समितीने कौतुक केले.या अवेक्षणा नुसार पदविका संस्थांना तंत्रशिक्षण मंडळ श्रेणी प्रदान करतात.

"अशा प्रकारच्या परीक्षणामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेत भर पडते आणि त्रुटी सुधारून अधिक प्रगती करण्याची संधी मिळते," असे मत महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ . संदीप शहा यावेळी व्यक्त केले.

याप्रसंगी संस्थेचे सचिव डॉ. धनंजय ठोंबरे, शरदचंद्र पवार शिष्यवृत्तीचे विश्वस्त श्री. प्रल्हाद वरे, गौरव जाधव, संस्थेचे विश्वस्त प्रवीण पोंदकुले,महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व विभागांचे विभागप्रमुख, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## जुन्नर येथे गांजाची झाडे लावणाऱ्यास स्थानिक गुन्हे शाखेने केली अटक

**नारायणगाव (दै. संध्या)**

पुणे ग्रामीण जिल्ह्याच्या हद्दीमध्ये अवैधरित्या सुरू असलेल्या गांजाच्या उत्पादन व विक्रीवर कारवाई करण्याच्या सूचना पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप गिल्ल यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद शिरसागर यांना गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, जुन्नर पोलीस स्टेशन हद्दीतील इंगळून येथे एका शेतामध्ये अवैधरित्या गांजाची झाडे लावली आहेत. मिळालेल्या बातमीनुसार गुन्हे शाखा तसेच जुन्नर पोलीस स्टेशन कडील स्टाफ यांनी सदर ठिकाणी जाऊन पाहणी केली असता गव्हाच्या तसेच बाजरीच्या शेतामध्ये गांजाची झाडे लावल्याचे दिसून आले. सदरचे शेत दिनकर विठ्ठल डामसे (वय ६० राहणार इंगळून) यांचे असल्याचे समजल्याने त्यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता सदरची



गांजाची झाडे त्यांनी लावल्याचे कबूल केले. सदर ठिकाणी पंचनामा करून गांजाची झाडे जप्त करण्यात आली असून त्याबाबत जुन्नर पोलीस स्टेशन येथील पोलीस अंमलदार अजित गेंगजे यांनी फिर्याद दिली असून पुढील कारवाई जुन्नर पोलीस स्टेशन येथे सुरू आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री संदीप गिल्ल, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे , उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर,जुन्नर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक किरण अवचर,

सहायक पोलीस निरीक्षक महादेव शेलार, अरविंद गाटकुळ, पोलीस सब इन्स्पेक्टर रघुनाथ शिंदे, ऋषिकेश तिटमे, सहायक फौजदार दीपक साबळे, पोलिस हवालदार संदीप वारे,अक्षय नवले, राजू मोमिन, जुन्नर पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार सागर हिले, सागर शिंदे, गणेश शिंदे, अजित गेंगजे, संतोष पठार यांनी केली आहे.

# कांदा, वाटाणा व टोमॅटोची विक्रमी आवक; पालेभाज्यांचे भाव कडाडले

**चाकण (दै. संध्या)**

खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये कांदा, वाटाणा व टोमॅटोची विक्रमी आवक झाली. हिरवी मिरची, वांगी, चवळी व बटाटा यांचे भाव गडगडले आहेत. कांद्याची प्रचंड आवक झाल्याने भाव कोसळले. चाकण बाजारात पालेभाज्यांचे भाव कडाडले आहेत. एकूण उलाढाल ६ कोटी १० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक ९ हजार ५०० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक १ हजार ५०० क्विंटलने वाढल्याने भावात १०० रुपयांची घसरण झाली. कांद्याचा कमाल १,४०० रुपयांवरून १,३०० रुपयांवर स्थिरावला. बटाट्याची एकूण आवक १,१०० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक ३०० क्विंटल ने घटल्याने भावात शंभर रुपयांची वाढ झाली. बटाट्याचा कमाल भाव १,२०० रुपयांवरून १,३०० रुपयांवर पोहोचला.

लसणाची एकूण आवक ५० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक स्थिर राहूनही कमाल भावही १२ हजार रुपयांवर स्थिरावले.

हिरव्या मिरचीची एकूण आवक ३४० क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ५ हजार रुपयांपासून ६,५०० रुपयांपर्यंत भाव मिळाला.

शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे - कांदा - एकूण आवक - ९,५०० क्विंटल. भाव क्रमांक - १.१,३०० रुपये, भाव क्रमांक २.१,१०० रुपये, भाव क्रमांक ३. ८००. बटाटा - एकूण आवक - १,१०० क्विंटल. भाव क्रमांक १.१,३०० रुपये, भाव क्रमांक २.१,२०० रुपये, भाव क्रमांक ३.७०० रुपये.

फळभाज्या - फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे - टोमॅटो - २९४ क्विंटल (१,००० ते १,५०० रू.), कोबी - २३२ क्विंटल (४०० ते ६०० रू.), फ्लॉवर - २०५ क्विंटल (८०० ते १,४०० रु.), वांगी - ९२ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), भेंडी - ८४ क्विंटल (२,५०० ते ४,००० रु.), दोडका - ५७ क्विंटल (२,५०० ते ३,५०० रु.), कारली - ६७ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), दुधीभोपळा - ६२ क्विंटल (१,००० ते १,६०० रु.), काकडी - ९३ (क्विंटल (१,००० ते १,६०० रु.), फरशी - २० क्विंटल (३,००० ते ४,००० रु.), वालवड - ४२ क्विंटल (३,००० ते ४,००० रुपये), ढोबळी मिरची - १४९ क्विंटल (३,००० ते ४,००० रु.), चवळी - ४२ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), वाटाणा - ७० क्विंटल (४,५०० ते ५,५०० रू.), शेवगा - ३५ क्विंटल (२,५०० ते ३,५०० रु.), गाजर - ५७ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), गवार - ४८ क्विंटल (५,००० ते ७,००० रु. ), आले - १५५ क्विंटल (३,००० ते ४,००० रु.).

पालेभाज्या - चाकण येथील बाजारात पालेभाज्यांची एकूण आवक जुड्यांमध्ये व भाज्यांना मिळालेले भाव पुढीलप्रमाणे - मेथी - एकूण १३ हजार ९७० जुड्या (५०० ते ८०० रुपये ), कोथिंबीर - एकूण २६ हजार १५० जुड्या (४०० ते ७०० रुपये,), शेपू - एकूण २ हजार ५५४ जुड्या (६०० ते ८०० रुपये), पालक - एकूण २ हजार ८३८ जुड्या (४०० ते ६०० रुपये),



## थोडक्यात पण महत्वाचे...



### लालपरी (एसटी) विषयी महाराष्ट्राची आस्था वर्षानुवर्षे टिकलीय - प्रा.एल.बी.पाटील

उरण (दैनिक संध्या) : उरण एसटी डेपोमध्ये एसटी विषयी आस्था आणि एसटी महामंडळाची व्यवस्था याविषयावर आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे साहित्यरत्न रायगडभूषण प्रा.एल.बी.पाटील आपल्या भाषणात म्हणाले की महाराष्ट्रातील मोठ्या शहरांपासून लहान खेड्यात लालपरी एसटीच्या भावनां आपुलकीच्या राहिल्या आहेत.त्यामुळे प्रत्येक माणसात एसटी विषयी आस्था असून खेडोपाड्यात एसटी थांबून नात्याप्रमाणे व्यवस्था मंडळाने केली आहे. डेपोचे व्यवस्थापक गद्रे यांनी प्रास्ताविक करून पाहुण्यांचे स्वागत केले. यावेळी जेएनपीए फायनान्सचे डेप्युटी मॅनेजर महादेव घरत यांच्या सामाजिक सेवेबद्दल डेपो तर्फे सत्कार करण्यात आला.धनंजय पाटील यांनी सुरेख सूत्रसंचालन केले. यावेळी विषयानुरूप शासनमान्य नशाबंदी विरोधात प्रचारक लवेंद्र मोकल यांनी. "माझी एसटी", आदर्श शिक्षक संजीव पाटील यांनी " घातक नशा तंबाखूची " ॲड.मच्छिंद्र घरत यांनी तंबाखूवर अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले तर अनामिका राम या हिंदी भाषिक कवयित्रीची " लाल परी" ही कविता सादर करून एसटी कर्मचाऱ्यांना आनंद दिला.धनंजय पाटील यांनी पाहुण्यांचे आभार मानले.

### मदतीसाठी कल्याण येथे भव्य दिव्य भारत सन्मान पुरस्कार 2026 चे आयोजन

कल्याण (दैनिक संध्या) : जनसेवा हीच खरी ईश्वर सेवा हे ब्रीद वाक्य घेऊन सतत समाजसेवा करणारे रामजीत उर्फ जितू महादेव गुप्ता यांनी सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा, वैद्यकीय, आरोग्य, साहित्य, पत्रकारिता, कवी, कला व इतर क्षेत्रातील समाजासाठी निस्वार्थ सेवा करणाऱ्या समाजसेवकांचा प्रतिष्ठित मान्यवरांच्या हस्ते त्यांच्या कर्तृत्वाचा सन्मान म्हणून भारत सन्मान पुरस्कार 2026 पुरस्कार सोहळा इंडियन कॉपी राईट प्रोटेक्शन मुंबई तर्फे इंडियन कॉपीराईट प्रोटेक्शन (ॲन्टि पायरसी सेल) मुंबई चे मुख्य तपासी अधिकारी रामजित(जितु) गुप्ता यांनी रविवारी दिनांक 19 एप्रिल 2026 रोजी सकाळी 10.00 ते 4.00 या वेळेत के.एम.अग्रवाल कॉलेज ए/सी. ऑडिटेरियम पडघा रोड, खडकपाडा, कल्याण (प) येथे अतिशय भव्य दिव्य असा पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले आहे सोबतच आकर्षक नृत्य ,महिलांसाठी खेळ मनोरंजनाचे कार्यक्रम व भरपूर बक्षीसांची लयलूट, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन सुद्धा केले आहे. सकाळी नाष्टा, पिण्याचे पाणी व दुपारच्या जेवणाची सोय सुद्धा करण्यात आलेली आहे संपूर्ण महाराष्ट्रातील निस्वार्थ समाजसेवा करणाऱ्या समाजसेवकांनी आपली उपस्थिती देऊन सदर पुरस्कार प्राप्त करावा असे आव्हान आयोजक रामजीत उर्फ जितू गुप्ता यांनी केलेले आहे. अधिक माहितीसाठी रामजीत उर्फ (जीतु) गुप्ता यांच्याशी संपर्क करावा.

# ऊर्जा परिवर्तनातून स्वस्त, शाश्वत विजेकडे वाटचाल

मुंबई (दै. संध्या)

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात ऊर्जा परिवर्तनाद्वारे विद्युत क्षेत्राला नवी दिशा मिळाली आहे. त्यातून स्वस्त व शाश्वत विजेकडे वाटचाल सुरु झाली आहे. या कामगिरीचा सन्मान म्हणून नवी दिल्ली येथे शनिवारी (दि. २८) स्कोच समूहाच्या वतीने महावितरणला राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले. कार्यकारी संचालक श्री. भुजंग खंदारे व कार्यकारी अभियंता श्री. रोहित जोगदंड यांनी हा पुरस्कार स्विकारला.

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक ट्रिलिअन डॉलर्सची करण्यासाठी आगामी काळातील ऊर्जेची मागणी लक्षात घेता मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी रिसोर्स अ‍ॅडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. त्यानुसार सन २०३० पर्यंत तब्बल ३९ हजार ५०० हजार मेगावॅट हरित ऊर्जेसह ४५ हजार मेगावॅट विजेची आणखी भर पडणार आहे. त्यामुळे नवीकरणीय ऊर्जेची क्षमता १३ टक्क्यांवरून ५२ टक्के होईल. तसेच सुमारे ३ लाख ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून सुमारे ७ लाख रोजगार निर्माण होणार आहेत. पुढील पाच वर्षांमध्ये वीज खरेदीमध्ये ८२ हजार कोटी रुपयांची बचत होणार असल्याने सर्व वर्गवारीचे वीज दर कमी होत जाणार आहे. यात सन २०२९-३० पर्यंत सर्व वर्गवारीतील वीज दर कमी करण्यास मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने नुकतीच मंजुरी दिली आहे.



रिसोर्स अ‍ॅडेक्वेसी प्लॅनला अनुसरून महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी ऊर्जा परिवर्तनाला मोठा वेग दिला आहे. महावितरणने प्राधान्य दरांवर सर्व ऊर्जा स्त्रोतांमध्ये आतापर्यंत ७२ हजार ९१८ मेगावॅट क्षमतेच्या वीज खरेदीचे दीर्घकालीन करार (पीपीए) केले आहेत. यामध्ये ४७ हजार ३४७ मेगावॅट (६५ टक्के) अपारंपरिक ऊर्जेचा समावेश आहे. महावितरणच्या वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होणार आहे. त्यामुळे प्रामुख्याने औद्योगिक व व्यावसायिक विजेचे दर स्वस्त होत जाणार आहेत.

ऊर्जा परिवर्तनामध्ये प्रामुख्याने सौर ऊर्जा क्षेत्रात महावितरणने मोठी आघाडी घेतली आहे. शेतकऱ्यांना प्रामुख्याने दिवसा व शाश्वत वीजपुरवठा करणे, वीज खरेदीचा व पर्यायाने अनुदानाचा बोजा कमी करणे, औद्योगिक व व्यावसायिक वीजदर कमी करणे यासाठी जगातील सर्वात मोठ्या १६ हजार मेगावॅट क्षमतेच्या विक्रेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्पांची ‘मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.०’ सुरु करण्यात आली.

या योजनेतून ११ लाख ५६ हजार आणि मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेतून ८ लाख ८० हजार अशा एकूण २० लाख ३६ हजार शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा सुरू झाला आहे. यासह प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत आतापर्यंत राज्यात ५ लाख २ हजारांवर घरगुती ग्राहकांकडे १९०४ मेगावॅट क्षमतेचे छतावरील सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले आहे व त्यांचे मासिक वीजबिल देखील शून्यवत झाले आहे.

# दिव्यांग बांधवांचे जीवन सुलभ, सक्षम आणि स्वावलंबी करण्यासाठी महापालिका कटिबद्ध - सभापती पठारे

पिंपरी (दै. संध्या)

दिव्यांग नागरिकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे ही प्रशासनाची महत्त्वाची जबाबदारी असून, त्यांचे जीवन सुलभ, सक्षम आणि स्वावलंबी करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन महिला व बालकल्याण समितीच्या सभापती राणीमाई अशोक पठारे यांनी केले.



महानगरपालिका संचलित 'दिव्यांग भवन फाउंडेशन' ला समितीच्या वतीने सदिच्छा भेट (दि.२७) देण्यात आली. यावेळी संस्थेच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

या वेळी माजी नगरसेविका श्रद्धाताई रवीभाऊ लांडगे, महिला व बालकल्याण समितीच्या सर्व सदस्या, दिव्यांग भवनचे मुख्य कार्यकारी अधिकारी परेश गांधी, पूजा भापकर व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

या भेटीदरम्यान सभापती राणीमाई पठारे आणि श्रद्धाताई लांडगे यांनी दिव्यांग बांधवांसाठी उपलब्ध असलेल्या विविध आरोग्य सेवा, उपचार पद्धती, पुनर्वसन सुविधा आणि प्रशिक्षण उपक्रमांची प्रत्यक्ष पाहणी केली. संस्थेमार्फत राबवल्या जाणाऱ्या प्रकल्पांची माहिती घेत असतानाच, या सेवा अधिक प्रभावी आणि दर्जेदार कशा करता येतील, यावर त्यांनी भर दिला.

दिव्यांग बांधवांना मिळणाऱ्या सुविधांचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी सेवा विस्तारावर विशेष भर देण्याच्या सूचना यावेळी अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.विविध सामाजिक संस्थांच्या सहकार्याने दिव्यांगांना दर्जेदार आरोग्य सेवा आणि आवश्यक प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिका सर्वतोपरी प्रयत्न करत आहे.या भेटीमुळे दिव्यांग भवनच्या पुढील उपक्रमांना गती मिळणार असून, प्रशासकीय स्तरावर आवश्यक त्या उपाययोजना तातडीने करण्याचे निर्देशही यावेळी सभापती राणीमाई पठारे यांनी दिले.

## पंचगंगेचे पुन्हा प्रदूषण; काळे-फेसाळ पाणी, दुर्गंधीने शेतकरी संतप्त

मुंबई (दै. संध्या)

कुरुंदवाड : पंचगंगा नदीमध्ये पुन्हा एकदा रासायनिक सांडपाणी सोडल्यामुळे तेरवाड (ता. शिरोळ) येथील बंधाऱ्याजवळ नदीच्या पाण्याची भीषण अवस्था झाली आहे. काळपट, फेसाळलेले आणि तीव्र दुर्गंधीयुक्त पाणी वाहत असल्याचे चित्र आज सकाळपासून दिसून आले. या प्रकारामुळे परिसरातील शेतकरी संतप्त झाले असून शेतीसाठी हे पाणी वापरणे धोकादायक ठरत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

बंधाऱ्याच्या एका बाजूला जलपर्णीने संपूर्ण नदीपात्र व्यापलेले असताना दुसऱ्या बाजूला रासायनिक पाण्यामुळे काळसर, फेसाळलेले पाणी वाहताना दिसत आहे.

या दुहेरी संकटामुळे नदीचे नैसर्गिक स्वरूप पूर्णपणे बिघडले असून दुर्गंधीमुळे नागरिकांनाही त्रास सहन करावा लागत आहे.

महावीर कोप्पे म्हणाले, या प्रदूषित पाण्यामुळे पिकांना मोठा धोका निर्माण झाला आहे. शेतीला हे पाणी पाजल्यास जमिनीची सुपीकता कमी होण्याची शक्यता असून उत्पादनावरही विपरीत परिणाम होणार आहे. हे शेतीला पाणी पाजत असताना आमच्या हातावर इन्फेक्शन होऊन खाज सुटली आहे व हाताला खरूज निर्माण झाल्यासारखी स्थिती झाली आहे त्यामुळे शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण आहे.

दरम्यान, सकाळपासून नदीतील ही परिस्थिती पाहून शेतकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून केवळ कागदी घोडे नाचवले जात असून प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप शेतकरी नेते शाबुगोंडा पाटील यांनी केला आहे. “वारंवार होणाऱ्या प्रदूषणामुळे शेती धोक्यात आली आहे.

# इंदुमिल स्मारक उभारणीसाठी सरकारचा पुढाकार महत्वाचा

## गाझियाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या कामाची उपाध्यक्षांसह शिष्टमंडळाने केली पाहणी

मुंबई (दै. संध्या)

विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे हे दोन दिवसांच्या दिल्ली दौऱ्यावर असून, या दौऱ्यादरम्यान त्यांनी राम सुतार यांच्या गाझियाबाद येथील कारखान्यात सुरू असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य पुतळ्याच्या कामाची पाहणी केली. मुंबईतील इंदू मिल येथे उभारल्या जाणाऱ्या या पुतळ्याचे काम सध्या प्रगतीपथावर आहे.

या पाहणीवेळी राष्ट्रवादी सामाजिक न्याय सेलचे पदाधिकारी व इतर शिष्टमंडळ उपस्थित होते. २०१८ साली या पुतळ्याच्या उभारणीचे कंत्राट राम सुतार यांच्या कारखान्याला देण्यात आले होते. मात्र, २०२६ पर्यंत या प्रकल्पाच्या खर्चात वाढ झाल्याने शासनाने किंमतीतील तफावत तातडीने कंत्राटदाराला देण्याची गरज असल्याचे अण्णा बनसोडे यांनी स्पष्ट केले. यासंदर्भात त्यांनी लवकरच मुख्यमंत्री यांची भेट घेऊन प्रकल्पातील आर्थिक तफावत दूर करण्यासोबतच एमएमआरडीए कडून कंत्राटदारांना वेळेत निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करणार असल्याचे सांगितले.



दरम्यान, ३५० फूट उंचीच्या या भव्य पुतळ्यापैकी सध्या सुमारे ५० फूट काम पूर्ण झाले आहे. पुतळ्याचे बूट आणि पँटचा काही भाग तयार झाला असून उर्वरित काम गाझियाबाद येथील कारखान्यात सुरू आहे. हा प्रकल्प २०२७ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र स्मारकाच्या कामाला २०२८ उजाडणार असल्याचे चित्र आहे.

या स्मारकाबाबत बोलताना अण्णा बनसोडे यांनी सांगितले की, इंदू मिल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक हे भविष्यात एक मोठे पर्यटन आणि प्रेरणास्थळ ठरणार आहे. देश-विदेशातील लाखो अनुयायांसाठी हे केंद्र आकर्षणाचे ठिकाण ठरेल, तसेच बाबासाहेबांच्या विचारांचे जतन करणारे एक महत्त्वपूर्ण स्थळ म्हणूनही ते ओळखले जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# उद्योजकता म्हणजे समस्यांवर प्रभावी उपाय शोधण्याची वृत्ती - झनवर

पिंपरी (दै. संध्या)

उद्योजकता म्हणजे नव कल्पना, नेतृत्व गुण, जोखीम स्विकारण्याची तयारी आणि समस्यांवर प्रभावी उपाय शोधण्याची वृत्ती विकसित करणारी एक चळवळ आहे, असे गणित अंक प्रा. ली.कंपनीचे चे संस्थापक अंकुश झनवर यांनी सांगितले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च (पीसीसीओइआर), रावेत येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेंटर फॉर इनोव्हेशन, इनक्युबेशन, अँड इंटरप्राईज (सीआयआयइ) यांच्या सहकार्याने “एसपीपीयू स्टार्टअप टॉक सिरीज कन्वर्सेशन विथ यंग आंत्रप्रेन्यूअर्स" चे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी नेक्सवीटेक इंडिया प्रा. ली.चे संचालक सुजीत लोमटे, पीसीसीओइआरचे संचालक प्राचार्य डॉ. हरीश तिवारी, उप संचालक डॉ राहुल मापारी व अधिष्ठाता डॉ. अर्चना चौगुले, अधिष्ठाता आर अँड डी प्रमुख डॉ. सुदर्शन एस. बोबडे, आर अँड डी सह अधिष्ठाता डॉ. राहुल बावणे, डॉ. किशोर भंगाळे, विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधन समन्वयक आदी उपस्थित होते. एसपीपीयू स्टार्टअप टॉक सिरीज मध्ये एकूण ११५ पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

विद्यार्थ्यांमध्ये नवोन्मेष, स्टार्टअप संस्कृती व उद्योजकता वृत्ती विकसित करणे, तरुण उद्योजकांना थेट महाविद्यालयीन कॅम्पस मध्ये आणून त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवाद्वारे विद्यार्थ्यांना प्रेरित करण्याचा या मालिकेचा उद्देश होता असे अधिष्ठाता आर अँड डी प्रमुख डॉ. सुदर्शन एस. बोबडे यांनी सांगितले. संचालक नेक्सवीटेक इंडिया प्रा. ली. चे सुजीत लोमटे यांनी स्टार्टअप उभारणीतील संधी, अडचणी, निधी उपलब्धता, नवकल्पनांचे व्यावसायीकरण आणि बाजार पेठेतील स्पर्धा याबाबत मार्गदर्शन केले.

स्वागत डॉ. सुदर्शन बोबडे, सूत्रसंचालन विद्यार्थी भाग्येश मखमाले आणि आभार डॉ. किशोर भंगाळे यांनी मानले. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई आणि पीसीसीओइआरचे प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली “एसपीपीयू स्टार्टअप टॉक सिरीज" पार पडली.

# इकोलिंकने केली ऑफिशियल पार्टनर म्हणून सनरायझर्स हैद्राबादबरोबर भागीदारी

मुंबई (दै. संध्या)

बहुप्रतिक्षित अशा टी २० मौसमासाठी सिग्निफाय (युरोनेक्स्ट: लाईट) या लायटिंग क्षेत्रातील जगभरांत आघाडीवर असलेल्या कंपनी तर्फे आज वृध्दिंगत होणाऱ्या त्यांच्या इलेक्ट्रिकल ब्रॅन्ड इकोलिंक ची सनरायझर्स हैद्राबाद बरोबर भागीदारी केल्याची घोषणा करण्यात आली. इकोलिंक हा आता टिमचा ऑफिशियल पार्टनर बनला असून यामुळे ब्रॅन्ड ला संपूर्ण भारतातील पोहोच आणि दृष्यमानता वाढवण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकता आले आहे.

ग्राहकांबरोबरच्या सक्षम जोडणी सह विश्वसनीय आणि मुल्यावर आधारीत उपाय हे भारतीय घरांमध्ये इकोलिंक हा ब्रॅन्ड पोहोचत आहे. या सहकार्यामुळे आणि क्रिकेटच्या या मोठ्या प्रमाणामुळे ब्रॅन्ड हा शिरस्त्राणांसह मैदानातील महत्त्वपूर्ण ठिकाणी झळकण्यासह त्यांच्या महत्त्वपूर्ण अशा एकात्मिक प्रसार मोहिमांसह डिजिटल उपक्रमांमध्ये संपूर्ण स्पर्धेदरम्यान दिसणार आहे.

सिग्निफायच्या ग्रेटर इंडिया चे सीईओ आणि एमडी सुमित जोशी यांनी सांगितले “ सिग्निफाय मध्ये आम्ही नाविन्य आणून आमच्या ग्राहकांना खरे मुल्य देण्यासाठी वचनबध्द आहोत. यामध्ये इकोलिंक ब्रॅन्ड विश्वसनीय आणि योग्य उपाय हे भारतीय घरांना देण्यासाठी प्रयत्नशील असतो. देशभरातील ब्रॅन्डचे अस्तित्व वाढवत असतांनाच टी-२० लीग हा एक कोट्यावधी भारतीयांबरोबर जोडण्याचा उत्तम मंच उपलब्ध झाला आहे. सनरायझर्स हैद्राबाद बरोबरच्या या भागीदारी मुळे आम्हाला क्रिकेट चाहत्यां बरोबर जोडण्यासह संपूर्ण भारतातील घरांपर्यंत इकोलिंक ब्रॅन्ड पोहोचवणे शक्य होणार आहे. या भागीदारीतून ब्रॅन्डचे अस्तित्व मजबूत करुन जगभरांतील बदलत्या बाजारपेठांमध्ये वाढीची गती गतीमान करण्याची संधी आम्हाला मिळेल.” सिग्निफाय च्या ग्रेटर इंडिया चे स्ट्रॅटेजी आणि मार्केटिंग चे प्रमुख निखिल गुप्ता यांनी सांगितले “ इकोलिंक ने ग्राहकांच्या




मनात उत्तम स्थान निर्माण केले आहे आणि ही भागीदारी म्हणजे हे स्थान अधिक वाढवण्यासाठी उचलण्यात आले आहे. वाढते अस्तित्व आणि विश्वसनीय, उच्च कार्यक्षम उपाय देण्यावर लक्ष केंद्रित केल्याने इकोलिंक हे सनरायझर्स हैद्राबादच्या तत्वज्ञानानुसार असून यामुळे संधी, सातत्याला चालना आणि विश्वास निर्माण करत आहे. उच्च क्षमतेची दृष्यमाता, एकात्मिक मोहिमा आणि फॅन फर्स्ट एंगेजमेंट मुळे आम्ही ग्राहकांशी जोडले जाऊन भारतीय घरांमधील इकोलिंकची विश्वसनीय आणि सोपा ब्रॅन्ड अशी छबी अधिक सक्षम करु शकू.”

सनरायझर्स हैद्राबाद चे सीईओ श्री. के षण्मुगम यांनी सांगितले “इकोलिंक बरोबर भागीदारी करतांना आंम्हाला आनंद झाला आहे. सनरायझर्स हैद्राबादची संस्कृती ही नाविन्यावर आधारीत असल्याने त्यांचे मोठ्या प्रमाणावर फॅन्स आहेत. आम्हाला खात्री आहे की या भागीदारीमुळे फॅन्सचा अनुभव समृध्द होऊन आम्ही ट्रॉफी साठी लढत असतांना त्यांची उर्जा उच्च दर्जाची राहील.”

या मौसमात सनरायझर्स हैद्राबाद हे मजबूत टिमसह उतरत असून कर्णधार इशान किशन आणि प्रमुख प्रशिक्षक डॅनियल व्हिटोरी च्या मार्गदर्शनाखाली ही टिम सहभागी होत आहे. या टिम मध्ये अनेक दिग्गज असून यांत अभिषेक शर्मा, इशान किशन, पॅट कमिन्स, ट्रेव्हिस हेड, हेन्रीच क्लासन, नितीश कुमार रेड्डी, हर्षल पटेल, जयदेव उनाडकट आणि लियाम लिव्हिंगस्टन यांचा खेळ या मौसमात फॅन्सना एक पर्वणीच उपलब्ध करुन देणार आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### कडेपठार गडावरील खंडोबा देवाला सूर्य किरणांचा सोनेरी अभिषेक

जेजुरी (दैनिक संध्या) : महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या कडेपठार गडावर खंडोबा मंदिरात सूर्याच्या सोनेरी सुवर्ण किरणांनी देवाला अभिषेक घातला. महाराष्ट्राचे कुलदैवत खंडोबा देवाचे जयाद्रीच्या डोंगरात कडेपठार येथे खंडोबा देवाचे मूलस्थान असणारे मंदिर आहे. मार्च महिन्याच्या 21 तारखे नंतर सर्वत्र सूर्य किरणे लंबरूप म्हणजे सरळ पडतात. वास्तु शास्त्राला अनुसरून बांधण्यात आलेल्या प्राचीन मंदिरात ही सूर्य किरणे थेट पडतात. आज पहाटे जेजुरीच्या कडेपठार खंडोबा मंदिरात सूर्य किरणांनी थेट प्रवेश करून मंदिरातील स्वयंभू शिवलिंग व खंडोबा देवाच्या मूर्तीवर या सुवर्ण किरणांनी अभिषेक केला. यावेळी कडेपठार नित्यसेवा वारकरी, पुजारी सेवक वर्ग, व भाविकांनी येळकोट येळकोट जयमल्हारचां जयघोष करून भंडाराची उधळण केली. वर्षातून दोन वेळा हा सुर्य किरणांचा सोहळा कडेपठार गडावर पाहण्यास मिळतो. जेजुरीच्या कडेपठार गडावरील खंडोबा मंदिरात सूर्य किरणांनी देवाला अभिषेक घातला.

### चाकण परिसरात युद्धजन्य परिस्थितीचा गॅस सिलिंडर वितरणावर परिणाम

चाकण (दैनिक संध्या) : आखाती देशातील युद्धजन्य परिस्थितीचा गॅस सिलिंडर वितरणावर परिणाम झाला आहे. सिलिंडरच्या तुटवड्यामुळे व अनियमित पुरवठ्यामुळे हॉटेल, रेस्टॉरंट, ढाबे, व्यवसायिक संकटात सापडले आहेत. चाकण भागातील अनेक हॉटेल व लहान खाद्यपदार्थ व्यावसायिक यांना गॅस सिलिंडर उपलब्ध होत नाही. त्यामुळे त्यांना लाकूड कोळशाच्या व डिझेल भट्टीचा उपयोग करावा लागत आहे. चाकण मध्ये अनेक एजन्सी समोर गॅस सिलिंडर मिळवण्यासाठी नागरिक गर्दी करीत आहेत. एजन्सी समोर रांगा लावू नका, असा दम एकीकडे भरला जात असून, दुसरीकडे १० ते १५ दिवस उलटूनही गॅस सिलिंडर सर्वसामान्य नागरिकांना मिळत नसल्याची कैफियत अखिल भारतीय वारकरी महामंडळाचे प्रदेश संपर्क प्रमुख विनोद महाळुंगकर पाटील यांनी नागरिकांच्या वतीने मांडली आहे.



### डिकसळला मंगळवारी ग्रामदैवत योगेश्वरी देवीची यात्रा

भिगवण (दैनिक संध्या) : डिकसळ (ता.इंदापुर) येथील ग्रामदैवत योगेश्वरी देवीची यात्रा मंगळवार (ता.३१) व बुधवार (ता.१) रोजी होणार असून नवसाला पावणारी देवी म्हणून योगेश्वरी देवीची ख्याती असल्याने ग्रामस्थ महिला व परिसरातील नागरिकांसह पै पाहुणे मोठ्या संख्येने या यात्रेला गर्दी करतात. त्यानुसार संपूर्ण मंदिर परिसराची स्वच्छता केली असून मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. त्याचबरोबर सुरक्षेच्या दृष्टीने भिगवण पोलीस स्टेशनला माहिती देण्यात आली आहे. मंगळवार ( ता.३१) रोजी पहाटे ४ वाजता देविचा अभिषेक, सकाळी ७ वाजता पुजाऱ्याचा मानाचा दंडवत त्यानंतर सकाळी ७ ते दुपारी १ ग्रामस्थांचा दंडवत सायंकाळी ६ ते ९ शेरणी, सायंकाळी९ ते ११ छबिना नंतर देवीची आरतीनंतर मनोरंजनपर रात्री संजय हिवरे यांचा लोकनाट्य तमाशा बुधवार ( ता.१) रोजी सकाळी ८ वाजता विडावाटप, सकाळी ९ वाजता हजेरीसाठी मनोरंजनपर बारा गावच्या बारा अप्सरा यांचा आर्केस्ट्राचा कार्यक्रम दुपारी ४ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत परिसरातील मल्लांना प्रोत्साहनपर जंगी कुस्त्यांचा आखाडा भरविण्यात येणार असल्याची माहिती यात्रा कमिटीने दिली.

### सुरक्षा रक्षकांला मारहाण प्रकरणी बारामती शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

बारामती (दैनिक संध्या) : बारामती नगर परिषद आस्थापनेत कार्यरत असलेल्या जेष्ठ सुरक्षा रक्षकांने सुरक्षा रक्षक पर्यवेक्षक दत्तात्रय अशोक साळवे यांना दोन महिन्यांपासून पगार होत नाही म्हणून विचारले असता मनात राग धरून सुरक्षा पर्यवेक्षक दत्तात्रय अशोक साळवे यांनी जेष्ठ सुरक्षा रक्षक विजय मधुकर बगाडे यांना शिवीगाळ करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला त्या वेळी काही सुरक्षा रक्षकांनी मध्यस्थी केल्याने विजय बगाडे हे थोडक्यात बचावले.या बाबत बारामती शहर पोलिस ठाण्यात आज दि.२८ मार्च २०२६ रोजी स्वराज्य शक्ती सेनेच्या संस्थापक अध्यक्षा सौ.करुणाजी धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली व महाराष्ट्र प्रदेश सचिव प्रशांत सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली बारामती शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांना निवेदन देऊन जेष्ठ सुरक्षा रक्षक विजय मधुकर बगाडे यांना जीवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या दत्तात्रय अशोक साळवे या सुरक्षा पर्यवेक्षकावर दोन दिवसात कारवाई करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.त्या वेळी स्वराज्य शक्ती सेनेचे पुणे जिल्हाध्यक्ष तुषार गायकवाड,पुणे जिल्हा महासचिव दत्तात्रय माने व स्वराज्य शक्ती सेना कामगार विंग चे संतोष चव्हाण,प्रविण कांबळे, संकेत भुजबळ,नितीन शिंदे,शिर्के यांच्यासह बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.




# जिल्ह्यात २२ लाख खात्रीशीर मतदार, विशेष पुनरीक्षण सुरू

**पुणे (दै. संध्या)**

राज्यातील सर्वाधिक ९१ लाख ६० हजार मतदार असलेल्या पुणे जिल्ह्यात केंद्रीय निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाची पूर्वतयारी म्हणून जिल्ह्यात सध्या सुरू असलेल्या मतदारांच्या दोन याद्यांच्या पडताळणीचे काम सुमारे २५ टक्के पूर्ण झाले आहे. पडताळणी झालेल्या एकूण मतदारांची संख्या सुमारे २२ लाख असून, या मतदारांना एप्रिलमध्ये होऊ घातलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमात सहभागी होण्याची गरज नाही.

ज्या मतदारांची नावे पुणे जिल्ह्यात २००२ च्या यादीत नाहीत, अशा मतदारांनी २००२ मध्ये ज्या ठिकाणच्या यादीत नावे आहेत, याचा पुरावा काढून ठेवावा, जेणेकरून मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना पडताळणी करणे सोपे होईल, असे आवाहन उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर यांनी केले आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्रासह २२ राज्यांमध्ये मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाला मान्यता दिली आहे. हा कार्यक्रम प्रत्यक्षात एप्रिलमध्ये सुरू होणार आहे. त्यानुसार राज्यातील २०२५ मधील मतदार यादीची पडताळणी २००२ च्या मतदार यादीशी करण्यात येत आहे. पुणे जिल्ह्यातही अशी पडताळणी सुरू झाली आहे. जिल्ह्यात २०२५ च्या मतदार यादीनुसार ९१ लाख ५९ हजार ५९८ मतदार आहेत. त्यानुसार २००२ च्या तसेच २०२५ च्या मतदार यादीत नाव पुणे जिल्ह्यातच असलेल्या मतदारांची पडताळणी सुरू करण्यात आली आहे. आतापर्यंत २२ लाख २१ लाख ९६१ मतदारांची पडताळणी पूर्ण झाली आहे. एकूण मतदार संख्येच्या हे प्रमाण २४.२६ टक्के इतके आहे. यात बारामती मतदारसंघ आघाडीवर आहे. या मतदारांना चिन्हांकित करण्यात येत असून, चिन्हांकित मतदार अंतिम असल्याचे गृहित धरण्यात येतील.



जिल्ह्यात बारामती मतदारसंघात हे काम आघाडीवर असून, यानंतर भोर व आंबेगाव मतदारसंघांचा क्रमांक आहे. पुणे शहरात कसबा पेठ मतदारसंघात पडताळणी झालेल्या मतदारांचे काम अधिक आहे. या पडताळणीसाठी केंद्रस्तरीय अधिकारी त्यांच्या मतदान केंद्राच्या हद्दीतील मतदारांशी फोनवरून व प्रत्यक्ष संपर्क साधत आहेत. मतदारांनी २००२ च्या यादीचा पुरावा दिल्यास पडताळणीचे काम पूर्ण होत आहे. फोनवरूनही मतदारांशी संपर्क साधून ही पडताळणी केली जात आहे. त्यामुळे मतदारांनी या अधिकाऱ्यांना प्रतिसाद द्यावा, असे आवाहन कळसकर यांनी केले आहे. काही मतदार या अधिकाऱ्यांच्या फोनला प्रतिसाद देत नसल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. प्रतिसाद न दिल्यास या मतदारांच्या नावाची पडताळणी करणे शक्य होणार नाही. प्रत्यक्ष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमावेळी त्यांना मतदार यादीत नाव कायम ठेवण्यासाठी कागदोपत्री पुरावे सादर करावे लागणार आहेत.

जे मतदार २००२ च्या मतदार यादीत त्याच मतदारसंघात नाहीत अशांना अन्य मतदारसंघात नाव असल्याचा पुरावा द्यावा लागणार आहे. मतदार यादीत नाव नसल्यास आई-वडिलांचे, आजोबांचे किंवा पणजोबांचे नाव असल्याचा पुरावा द्यावा लागणार आहे. २००२ नंतर जन्मलेल्या मतदारांना गणना अर्ज भरताना जन्मदाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला द्यावा लागणार आहे. तसेच २००२ मध्ये मतदार ज्याठिकाणी होता, त्या ठिकाणाचा रहिवासाचा पुरावा द्यावा लागणार आहे.

अधिकाऱ्यांकडून या प्रमाणपत्राची पडताळणी केली जाणार आहे. ही कागदपत्रे योग्य आहेत, असे निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांचे मत झाल्यानंतरच त्याचे नाव मतदार यादीत समाविष्ट करण्यात येणार आहे. त्यासाठी सुनावणीचा पर्याय देण्यात आला आहे. त्यावेळी कागदपत्रांची पूर्तता करावी लागणार आहे, अन्यथा अशा मतदारांची नावे वगळण्यात येणार आहेत. ज्या जिल्ह्यात एखाद्या मतदाराची पडताळणी पूर्ण झाल्यास त्याचे पूर्वी ज्या मतदारसंघात नाव आहे, अशा ठिकाणच्या मतदार यादीतून त्याचे नाव त्याठिकाणी पडताळणी नसल्याने आपोआपच बाद होणार आहे.

## आळंदीतील थोरवे वस्ती येथे रामनवमी व हिंदू संमेलन उत्साहात

**आळंदी (दै. संध्या)**

चऱ्होली खुर्द परिसरातील थोरवे वस्ती येथे हिंदू संमेलन समितीतर्फे रामनवमी उत्सव व हिंदू संमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. अभिमानश्री सोसायटी येथून शोभायात्रेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. सजवलेल्या रथावर प्रभू श्रीरामांचे छायाचित्र ठेवण्यात आले होते.

लहान मुलांनी श्रीराम, लक्ष्मण, सीता तसेच विविध महापुरुषांच्या वेशभूषेत सहभागी होत शोभायात्रेला आकर्षण प्राप्त करून दिले. श्री शिवाजीराज मर्दानी आखाडा यांनी लाठी-काठी, तलवारबाजी व दांडपट्टा अशा कलेचे सादरीकरण केले. सुमारे १७०० नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमस्थळी दीपप्रज्वलनानंतर प्रकाश भगवान क्षीरसागर यांनी 'पंच परिवर्तन' विषयावर मार्गदर्शन केले. त्यानंतर अक्षय गोपाल चंदेल यांनी हिंदुत्व, सनातन परंपरा व संस्कार जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले. छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांच्या कार्याचा उल्लेख करत समाजाने जागरूक राहण्याचे आवाहन करण्यात आले.

ह.भ.प. शिवाजी महाराज नवल व सौ. सोनाली टेंभे यांनीही समाजप्रबोधनपर विचार मांडले.




कार्यक्रमाचे अध्यक्ष कैलाश थोरवे व उपाध्यक्ष अशोक थोरवे होते. पोलीस बंदोबस्तात कार्यक्रम शांततेत पार पडला. शेवटी प्रभू श्रीरामांच्या आरतीने सांगता करून महाप्रसाद वाटप करण्यात आले.

## पीएमपीच्या विधी अधिकाऱ्यांचे कार्यालय केले सील

**पुणे (दै. संध्या)**

पुणे महानगर परिवहन महामंडळ (पीएमपीएमएल) मधील विधी अधिकारी धनेश्वर जाधव यांचे कार्यालय प्रशासनाकडून सील करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या कारवाईमुळे पीएमपीएमएल वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

प्राथमिक माहितीनुसार, काही प्रशासकीय व कायदेशीर प्रक्रियांशी संबंधित अनियमितता तसेच कागदपत्रांची तपासणी करण्यासाठी ही कारवाई करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. संबंधित प्रकरणात महत्त्वाची कागदपत्रे सुरक्षित ठेवण्यासाठी कार्यालय सील करण्यात आले असल्याची चर्चा आहे. या कारवाईमागील नेमके कारण अद्याप अधिकृतपणे स्पष्ट करण्यात आलेले नसून, वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून चौकशी सुरू असल्याचे कळते.



चौकशीअंती पुढील कारवाई केली जाणार असल्याचेही संकेत मिळत आहेत. दरम्यान, या घटनेमुळे पीएमपीएमएलमधील प्रशासनिक कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## पुण्यात अंधश्रद्धेचा पगडा कायम; पाच वर्षांत 50 हून अधिक गुन्हे

**पुणे (दै. संध्या)**

शिक्षणाचे माहेरघर आणि आयटीचे हब अशी ओळख असलेल्या पुरोगामी पुण्यावर अद्यापी जादूटोणा, अघोरी प्रथा अशा अंधश्रद्धेचा पगडा कायम आहे. महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अघोरी प्रथा आणि जादूटोणा प्रतिबंध कायद्यानुसार पुणे शहर व परिसरात गेल्या पाच वर्षांत पन्नासहून अधिक गुन्हे दाखल झाले आहेत. यावरूनही हेच स्पष्ट होते.

नाशिकजवळील मिरगावचा भोंदू अशोक खरातचे प्रकरण राज्यभर गाजत असतानाच माहिती अधिकार कार्यकर्ते सचिन नेलेकर यांनी पोलिसांकडून मिळविलेल्या माहितीमुळे पुण्यातील अंधश्रद्धेबाबतचे हे भयानक वास्तव समोर आले आहे. अंधश्रद्धाविरोधी कायद्यासाठी आयुष्यभर लढा देणाऱ्या डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या पुण्यातच असे प्रकार सुरू आहेत, हे सहजासहजी कोणाला पटले नसते, पण दुर्दैवाने ही वस्तुस्थिती आहे, हे मान्य करावे लागते. 'तुझी बायको अवदसा आहे... तिच्यामुळे तुझं राजकारण संपेल... तिला सोडचिठ्ठी दे,' असा सल्ला देत एका 'हायप्रोफाइल' गुरूने विवाहित महिलेच्या आयुष्याशी खेळ केला होता. लिंबू उतरवणे, गृहदोष सांगणे आणि अघोरी विधी करण्याच्या नावाखालीही तिचा मानसिक छळ करण्यात आला होता. एका उच्चशिक्षित कुटुंबात घडलेली ही घटना पुण्यावरील अंधश्रद्धेच्या पगड्याची भीषणता अधोरेखित करणारी ठरली होती.

## गुणवत्ता संवर्धन अभियानांतर्गत तालुक्यातील शाळा तपासणी

**हवेली (दै. संध्या)**

विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी आणि नवीन शैक्षणिक धोरण २०२० राबविणे साठी शाळांना सक्षम व उपक्रम शील ठेवणेसाठी पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ व जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियानतीन गटांमध्ये राबविले जात आहे.

त्या नुसार ५ वी ते १२ वी ,५ वी ते १० वी,व ८ते १० वी वर्ग असणाऱ्या शाळांचे गट करण्यात आले आहेत. त्या नुसार संपूर्ण पुणे जिल्ह्यात तालुका स्तरावर सर्व शाळांची तपासणी करून प्रत्येक गटात प्रथम क्रमांक आलेल्या शाळांची जिल्हा स्तरीय पथकामार्फत तपासणी केली जात आहे.त्यानुसार हवेली तालुक्यात जिल्हा स्तरीय शाळा तपासणी सुरू झाली आहे.




या अभियानांतर्गत पुरोगामी माध्यमिक विद्यालय नायगाव या विद्यालयाची तपासणी पुणे शहर येरवडा विभागाचे मुख्याध्यापक संघाचे पदाधिकारी प्राचार्य संतोष भंडारी, प्राचार्य अजित लेंभे, प्राचार्य सुनील लाडके, प्राचार्य अजित माने राज्य पुरस्कार प्राप्त निवृत्त प्राचार्य टेमगीरे, श्री प्रदीप लोणकर यांनी केली.

परिपाठ, कवायत आणि स्काऊट गाईड संचलन विद्यार्थ्यांनी सादर केले. त्यानंतर विद्यालयात वर्षभर चालणारे उपक्रम, सहशालेय उपक्रम, आनंददायी शनिवार अंतर्गत उपक्रम, क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम यांची क्षणचित्रे पीपीटीच्या माध्यमातून विद्यालयाच्या विद्यार्थिनी पायल लांडगे व वैष्णवी चांगभले यांनी उत्कृष्ट स्पष्टीकरणासह दाखविली. त्यानंतर शाळेची दप्तर तपासणी शिक्षकांचे उपक्रम, वर्षभराचे शालेय नियोजन, पाहून समाधान व्यक्त केले.विशेषत: विद्यार्थ्यांनी संकलन करुन तयार केलेले हस्तलिखित, विज्ञान प्रयोग, पाहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

शिक्षकांना मार्गदर्शन करताना पथकातील अधिकाऱ्यांनी सांगितले भविष्यात मराठी शाळा टिकवायच्या असतील तर विद्यार्थी कृतीशील बनवावा लागेल त्याची अंगभूत असणारी कला कौशल्य विकसित करावी लागतील आणि त्याला शिक्षणातून आनंद द्यावा लागेल. त्यासाठी शिक्षकांनी नवतंत्रज्ञान अवगत करावे लागेल.

या तपासणीचे नियोजन विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रवीण गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले प्रेरणा पुरस्कार वितरण सन्मान सोहळा संपन्न

**जुन्नर (दै. संध्या)**

जुन्नर तालुका प्राथमिक शिक्षक संघ आयोजित क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले प्रेरणा पुरस्कार वितरण सन्मान सोहळा निलायम गार्डन मंगल कार्यालय नारायणगाव ता.जुन्नर येथे मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य शिक्षकनेते संभाजीराव थोरात होते. ज्येष्ठ मराठी साहित्यिक कवी फ.मु शिंदे यांनी आपल्या कवितांतून आईचे महत्त्व व आईविषयीच्या कविता सादर केल्या.

शिवजन्मभूमी जुन्नरचे आमदार शरददादा सोनवणे यांनी आपल्या मनोगतातून प्राथमिक शिक्षकांच्या प्रश्नांवर राज्यस्तरावर मंत्री महोदयांच्या समवेत सकारात्मक चर्चा करून शिक्षकांना फक्त शिकविण्याचेच काम द्यावे अशी मागणी करणार असल्याचे आश्वासन दिले.



कार्यक्रमाच्या निमित्ताने पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य गुलाबशेठ पारखे, मंगेश अण्णा काकडे, पंचायत समिती जुन्नर सभापती कमलताई शेळकंदे, उपसभापती अमित ढोले, पंचायत समिती सदस्य सुषमा वाव्हळ, संजय वऱ्हाडी, संभाजीराव चव्हाण, शांताराम दाते, राजेंद्र पिंगट, गटनेते जयसिंग पोटे, पुणे जिल्हा दूध उत्पादक संघाचे उपाध्यक्ष भाऊ देवाडे,विघ्नहर साखर कारखान्याचे चेअरमन सत्यशिलदादा शेरकर,शिवसेना जुन्नर तालुकाप्रमुख योगेश पाटे, सहाय्यक गटविकास अधिकारी विठ्ठल भोईर, गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे, शिक्षक संघ राज्याध्यक्ष बाळासाहेब मारणे, साने गुरुजी कथामाला जिल्हाध्यक्ष बाळासाहेब कानडे, राज्य संपर्कप्रमुख मंगेश मेहेर, जिल्हा सरचिटणीस खंडेराव ढोबळे, तालुका अध्यक्ष रमाकांत कवडे, राज्य प्रतिनिधी साहेबराव मांडवे, विकास मटाले, भरत बोचरे, जिल्हा प्रतिनिधी रामदास संभेराव, सुनिल हाडवळे, गणेश ढमाले, नानाभाऊ कणसे, संतोष पानसरे, माजी अध्यक्ष रविंद्र वाजगे, उपेंद्र डुंबरे, विठ्ठल तांबे, पतसंस्थेचे सभापती सचिन मुळे व पतसंस्थेचे सर्व संचालक, कवी संदिप वाघोले आदि मान्यवर व शिक्षक संघाचे सर्व आजी-माजी पदाधिकारी व तालुक्यातील शिक्षक बंधू भगिनी फार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तालुका अध्यक्ष रमाकांत कवडे यांनी तीन वर्ष केलेल्या शिक्षक संघाच्या कार्याचा आलेख मांडत शिक्षक संघ शिक्षकांच्या प्रत्येक प्रश्नाला न्याय देण्याचे काम करत असल्याचे सांगितले.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे राज्याध्यक्ष बाळासाहेब मारणे यांनी जुन्नर तालुका प्राथमिक शिक्षक संघाने केलेल्या कार्याचा गुणगौरव करत जुन्नरचे योगदान हे संघटनेमध्ये महत्त्वाचे असून प्रेरणा पुरस्कार खऱ्या अर्थाने शिक्षकांना शैक्षणिक वाटचालीस महत्त्वपूर्ण योगदान देणाराआहे. शिक्षकांच्या अशैक्षणिक कामांच्या विरोधात प्रसंगी न्यायालय मार्गाने लढा देण्याचे काम शिक्षक संघ करेल असे सांगितले.

अध्यक्षीय मनोगतात शिक्षक नेते संभाजीराव थोरात यांनी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ ही शिक्षकांच्या प्रत्येक प्रश्नाला वाचा फोडणारी राज्यातील अग्रगण्य संघटना असून जुन्नर तालुका संघ या शाखेने सुरू केलेला प्रेरणा पुरस्कार उपक्रम निश्चितपणे राज्यात आदर्शवत आहे.महाराष्ट्र राज्य शिक्षक संघ हा येणाऱ्या काळात बीएलओ व इतर अशैक्षणिक कामांच्या विरोधात मंत्रालयीन स्तरावर पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले.

मान्यवरांच्या शुभहस्ते जुन्नर तालुका प्राथमिक शिक्षक संघ डायरीचे प्रकाशन करण्यात आले. सहाय्यक गटविकास अधिकारी विठ्ठल भोईर यांच्यासह ३ केंद्रप्रमुख, २ मुख्याध्यापक, ६ पदवीधर शिक्षक, ८१ उपशिक्षक व १ विषय शिक्षक यांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले प्रेरणा पुरस्काराने फेटा बांधून तसेच सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्रक, शाल व गुलाबपुष्प देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला आघाडी अध्यक्षा शुभदा गाढवे यांनी केले. सूत्रसंचलन शिक्षक पतसंस्था संचालिका सुनिता वामन व तालुका शिक्षक संघ सरचिटणीस प्रभाकर दिघे यांनी केले तर आभार तालुका संपर्कप्रमुख संदिप शिंदे यांनी मानले.